# रूप-स्वरूप

(राधा-कृष्णावरील कवितासंग्रह - भाग १)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**रूप-स्वरूप** (राधा-कृष्णावरील कवितासंग्रह - भाग १)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : वैशाख शु. ५, श्री आद्य शंकराचार्य जयंती, शके १९४६
रविवार, दि. १२ मे, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-970674-4-0

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ **१५०/-**

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण



**ज्या अभेद्य मूर्तीने अमूर्त प्रेमाला साकार केले,**
**ज्या प्रेमाला मनामनात जागे केले,**
**खऱ्या प्रेमाची परिभाषा दिली त्या राधाकृष्णालाच**
**हा माझा काव्यसंग्रह प्रीतभऱ्या**
**अंतःकरणाने समर्पित!**

# मनोगत

राधाकृष्ण हे या जगातील अवीट प्रीतीचं एक अनमोल तत्त्व आहे. कितीही युगे उलटली तरी देखील या प्रेमामध्ये खचितही न्यूनता आलेली दिसत नाही. पावित्र्याने ओतप्रोत भरलेला आणि भारलेला हा प्रेमभाव म्हणूनच आदर्श ठरतो. मनाचा हा प्रेमभाव राधेच्या हृदयाच्या अंगणात असा काही वावरत असतो की राधा कृष्णमय झालेली दिसून येते.

या देहातीत अमर प्रीतीची गाथा असणाऱ्या राधा कृष्णाच्या प्रेम भावनेवर भारतातील अनेक प्रकारचे साहित्य निर्माण झालेला आहे. परस्परांवर असीम प्रीती करणाऱ्या, समर्पणाची भाषा ठरलेल्या, काळ-प्रसंग यांच्या पलीकडे गेलेली ही प्रेमकथा म्हणजेच राधाकृष्ण. यांच्या प्रेमाला कुठल्याही एका कोंदणात सजवून ठेवता येत नाही तर हे प्रेम क्षणोक्षणी नव्या नव्याने उमलत जाणारे, नव्या नव्याने भेटत जाणारे शाश्वत असेच ठरते.

राधा फक्त एक प्रेयसीचं नाव नसून, राधा ही प्रीतीची अलवार भावना आहे. कृष्ण हा तिच्या प्रीतीचा आधार, अधिष्ठान आहे. कृष्णा विना तिला काहीच दिसत नाही. तिच्या आयुष्यात त्याच्याशिवाय काहीच असत नाही आणि म्हणूनच राधाकृष्णांच्या या अमर प्रीतीचे काव्यातून उमटलेले काव्यचित्र म्हणजे हा काव्यसंग्रह आहे. मध्ये मध्ये मीरेची भक्तीपूर्ण समर्पण प्रीती देखील इथे डोकावते. स्त्री असो वा पुरुष राधाकृष्णांच्या या अलौकिक प्रीतीच्या धारेमध्ये अलगद वाहत जातात आणि प्रत्यक्षात न मिळालेले प्रेम सुद्धा राधाकृष्ण भावनेने पूर्ण होऊ लागते. मनाच्या पातळीवर ही प्रीत भावना इतकी समृद्ध असते की वास्तवातलं एखादं प्रेम आपल्या नशिबी नाही आलं तरीदेखील त्याचं वाईट वाटत नाही.

आपली राधा आपल्या मनात कृष्णाशी रासक्रीडा खेळत राहते आणि कृष्णही राधेच्या प्रेमाखातर सारं सोडून वेणूच्या सुरांवर स्वतःला झुलवत राहतो. हे स्वर स्वर्गीय आहेत. त्या प्रेमाला समर्पण आणि पावित्र्याचा गंध आहे. ही प्रीती इतकी

सखोल आहे की राधा-कृष्ण हे तत्व होऊन जातात आणि व्यक्तींच्या पलीकडे भावनेचा सागर उसळत जातो.

माझ्याही मनात राधाकृष्णांबद्दलच्या वेळोवेळी उमटलेल्या या भावतरंगांना काव्यरूप दिले गेले आणि त्याच या साऱ्या कविता एकत्रित करून हा काव्यसंग्रह रसिकांच्या हाती देताना हीच भावना आहे की युगायुगातील ही राधा कृष्णाची प्रीती, ही मीरा आणि कृष्णाची समर्पण भक्ती अशीच चिरंतन आपल्यालाही अनुभवता येवो. ते त्याचे सावळे रूप स्वरूप होऊन जावो.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

"Poetry is the spontaneous overflow of powerful passion" असं विख्यात कवी वर्डस्वर्थ यांनी म्हटलं आहे. उत्कट भावनांच्या अंत:स्फूर्त प्रवाहाचं प्रकटीकरण तसं कठीण! सर्वांना ते जमतं असं नाही. माणसाच्या भावना, संवेदनांवर भर असलेला, सत्य, शिव, सुंदराचा आत्मा असलेला आणि शब्द सामर्थ्याचा कस पाहणारा हा साहित्यप्रकार आहे. आशय संपन्नता, मर्मस्पर्शी विषय आणि हृदयाला भिडणारी संकल्पना अशी कवितेची जीवघेणी मागणी असते. पण मराठी, संस्कृत, इंग्रजी आणि हिंदी अशा अनेक भाषांमध्ये साहित्यनिर्मिती करणाऱ्या डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्यावर मात्र शारदादेवीचा वरदहस्त आहे. त्यामुळे सुंदर कविता त्यांच्या लेखणीला सहजसाध्य आहेत. त्यापैकीच त्यांचा हा नवा कोरा कवितासंग्रह ! डॉ. मंजूषा यांच्या कविता बहुतेक वेळा छंदोबद्ध असतात. शब्दांचा अचूक वापर, गेयता, मन:स्पर्शी संकल्पना ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये प्रस्तुत कवितासंग्रहातही आढळतात. तरीही या संग्रहाची खासियत वेगळी आहे. भारतीय मनाला भुरळ घालणारं, शरीराकडून आत्म्याकडे प्रवास करणारं प्रेम हा संपूर्ण कवितासंग्रहाचा विषय आहे. त्यात आत्मभाव आणि शरीरभाव यांनी कृष्णाला समर्पित मीराही भेटत राहते. या कवितांमधून उत्कट, उदारता इतक्या भावछटांनी आविष्कृत होते की रसिक वाचक त्यातील वैविध्याने थक्क व्हावा. एका ठिकाणी कवयित्री म्हणते...

**असे रंग की भरावे कर्म कुंचल्याने सारे**
**जणू मोरपीस मनी अलगद फिरणारे ।**
**मी ही अलवार राधा सारी बंधने तोडून**
**जीवलगी कृष्णसखा एक आत्म्याशी जोडून ।।**

राधेची सारी कर्मे ही कृष्णमयच आहेत. प्रत्येक कर्माचा कुंचला मोरपिसासारखा कृष्णनामासह मनात हळुवारपणे फिरत राहतो. तिच्या

भक्तिभावाने कृष्ण तिच्याशी अंत:करणाने जोडला जातो. हे सांगणाऱ्या या ओळी भारतीय तत्त्वज्ञानाचा तथ्यांशच मांडतात.

एका कवितेत कवयित्री म्हणते...

**राधा एक शरीर नाही**
**तत्त्वप्रेम आहे**
**राधा काय वेगळी का?**
**श्यामबिम्ब आहे.**

इथे राधेचा सायुज्यतेचा, एकरूपत्वाचा भाव आहे. अशारीरी प्रेम आहे, हे सारं इतकं उत्कट आहे की गोचर दृष्टीला दिसणारं राधेचं रूप हेही कृष्णाचं प्रतिबिंब आहे असं म्हणणाऱ्या राधेची पराकोटीची भक्ती इथे प्रतीत होते.

कृष्णाची निळ्या सावळ्या रंगाची अंगकांती सर्व कवितांमध्ये पसरून राहिली आहे. बहुतेक कवितांना या निळ्या रंगाने सालंकृत केलं आहे. ही निळाई तऱ्हेतऱ्हेने वाचकांच्या मनावर मुद्रांकित होउ जाते.

**न संपो कधी नवलाई निळ्याची**
**निळ्या रंगी राधा नि मीरा बुडावी**
**निळ्या जाहल्या भावना नीलपंखी**
**निळे सूर पाव्यातून घुमती**

कृष्णाची आकाशासारखी अथांग विशालता वेगवेगळ्या कवितांमधील निळ्या रंगाच्या आविष्कृतीतून प्रकट होत राहते.

डॉ. मंजूषा यांच्या कवितांमधील तरलता मनाला स्पर्शून जाते. प्रतीकांचा वापर इतक्या स्वाभाविकपणे असतो की त्यांच्यासह कविता अलगदपणे प्रवाहित होते. उदा. एका ठिकाणी कवयित्री लयबद्ध शवासोच्छ्वासांची सांगड सुखाच्या आरोह अवरोहांशी घालते तेंव्हा त्यातील तरलता मनाला स्पर्शून जाते.

**राधा, मीरा अजब रसायन । कृष्ण वितळुनी जाय ।।**

असा भक्तांच्या जीवनात वितळून जाणारा कृष्ण अनेक ठिकाणी प्रत्ययाला येतो. रसिकांच्या मनाला सहज स्पर्श करणाऱ्या या कवितांमध्ये आशयसंपन्न सौंदर्यस्थळे जागोजागी आढळतात.

**सहजची धरता तू मज । उमटुनी गाणे यावे ।**
**पावा म्हणून कोणी । मज तुझ्यासवे पुजावे ।।**

असं राधा म्हणते तेंव्हा तिच्या भक्तीतील सख्य भावाबरोबरच ईश्वरशरणता ही प्रत्ययाला येते.

**हे कळणे न सहज मर्म । प्रेमाचा गहन धर्म ।**
**जो जाणतसे हे वर्म । हो प्रीत श्रेय कर्म ।।**

ईश्वरप्रेम अंत:करणात उद्भवलं की ते श्रेयस आणि प्रेयस दोन्ही होऊन जातं हेच खऱ्या प्रेमाचं मर्म आहे, असं कवयित्री म्हणते. राधाकृष्णाचं एकरूपत्व आत्म्याचं मीलन ठिकठिकाणी व्यक्त होतं. हे या कवितांचं सार आणि हीच धार आहे.

संस्कृत भाषेवरील प्रेम आणि प्रभुत्वामुळे डॉ. मंजूषा यांची भाषा शालीन आणि सालंकृत झाली आहे. लालित्य, प्रवाहीपणा, भावगर्भत्व, अचूक शब्द योजना, अशा अनेक वैशिष्ट्यांनी संपन्न अशी त्यांची कविता रसिक मनाला भुरळ घातल्याखेरीज राहत नाही. डॉ. मंजूषा यांच्या प्रस्तुत कवितासंग्रहाबद्दल त्यांचं अभिनंदन करते आणि पुढील साहित्य प्रवासासाठी शुभेच्छा देते.

**– माधवी कुंटे**
ज्येष्ठ साहित्यिक, मुंबई
मो. ९८१९६ ७९५५०

# अनुक्रमणिका


१) जीवलगी कृष्णसखा ... ११
२) राधा श्यामबिंब आहे ... १२
३) निळी मदमस्ती ... १३
४) ही अनुप्रीती ... १४
५) जिथे स्वर श्रीहरी ... १५
६) वाटे राधा निळ्या बिलगली ... १६
७) निरभ्र माझे जीवन होईल ... १७
८) युगायुगांतून राधाकृष्णचि... १८
९) राधा हरीची झाली ... १९
१०) संगत सदा तुझी ती ... २०
११) राधा नाही उरलेली ... २२
१२) हो प्रीत श्रेय कर्म ... २३
१३) राधामोहन सूर ... २४
१४) मेंदीत भाव माझे ... २५
१५) जय जय राधेश्याम ... २६
१६) भाव पिसारे हलके ... २७
१७) मने फुलासम डोलून जातील ... २८
१८) नाद जडू दे जीवास कायम ... २९
१९) राधा ही कृष्ण झाली ... ३०
२०) राधेचा राधेश्याऽऽऽम ... ३१
२१) एकमात्र मी तरंग ... ३२
२२) समाधान ... ३३
२३) राधेश्याम रंग पावन ... ३४
२४) राधा तुजसंग चालली ... ३५
२५) एक राधा एक श्याम ... ३६
२६) धुन माझी जी अधुरी ... ३७
२७) होईल श्यामसुंदर ... ३८
२८) आस प्रीतीची फक्त तुझी ... ३९
२९) कृष्णाची राधा होता ... ४०
३०) राधा सूर होत जाई ... ४१
३१) राधा तुझीच ... ४२
३२) पारिजाती ओघळणे ... ४३
३३) एकरूप मग दोन मने ... ४४
३४) मन राधे राधे झाले ... ४५
३५) धुन ऐकू येवो श्याम ... ४७
३६) आल्हादाचा रंग गुलाबी ... ४७
३७) या प्रेमाची अलौकिक भक्ती ... ४८
३८) रानोमाळी फुलल्या ओळी ... ४९
३९) तुझ्या श्याम नीलरंगी ... ५०
४०) राधा होते समर्पणातुर ... ५१
४१) वर गोंदण कोंदण ... ५२
४२) का असा मी मोहित मोहन ... ५३
४३) राधा आणिक श्याम ... ५४
४४) तुझ्या चरणी रंगले ... ५५
४५) कृष्ण निळा मनभावी ... ५६

४६) मीरा तुझ्या भक्तीसाठी ... ५७
४७) घे ना राधिके ... ५८
४८) कृष्ण दामोदर ... ६०
४९) सांग राधे काय देऊ ... ६२
५०) राधे, आज कुंजवनी ... ६४
५१) काळा सावळा
हा श्याम ... ६५
५२) कृष्ण कोण?
चित्त माझे ... ६६
५३) श्याम तुला शोधू कुठे ... ६७
५४) हरी पदकमलासी ... ६८
५५) रूप राधेचं ... ६९
५६) चांदणशर्वरी ... ७०
५७) राधे तुझ्या प्रेमासाठी ... ७१
५८) एकतान राधा जीव ... ७२
५९) श्याम डवरून आला ... ७३
६०) कोणी लावीयले दीप ... ७४
६१) आज सांज म्हणे वेडी ... ७५
६२) राधा कोठे ... ७६
६३) निळ्या आभाळाची
माया ... ७७
६४) रंग गुलाबी सजला ... ७८
६५) अदृश्य प्रियधागे ... ८०
६६) सख्या आठवण तुझी ... ८१
६७) नभ कृष्णाई ... ८२
६८) जगावेगळी निळाई ... ८३
६९) मोरपिसे ... ८४
७०) रंगांचा कुंचला हरीचा ... ८५
७१) राधा ही सुमनवेशा ... ८६
७२) क्षितिजावरची लालिमा ... ८७
७३) कदंबपुष्पे ... ८८
७४) मूर्त तुझी ... ९०
७५) मी कृष्ण सखा ... ९२
७६) निसर्ग मोहन ... ९३
७७) राधेसंग कृष्ण रमे ... ९४
७८) साद ऐसी असो ... ९५
७९) आतून माझ्या
हरी बावळा ... ९६
८०) कृष्ण आत्मिक सुवास ... ९७



## (१)
## जीवलगी कृष्णसखा

अहा! आज काय रंग पसरले
पाहून मी भान सारे विसरले
आकाशाने आज खेळली की होळी
रंगपंचमीची उधळण झाली

आज आकाशी निळ्या या रंगात रंगला
फिका केशरी गुलाबी रंग ढवळा विरला
सरोवर सुंदर ते देखणाची आरसा की
नभातून अप्सरांची इथे प्रतिबिंबा दाटी

नभ आधीच सुरेख त्यात वर्ण रमणीय
झाडे झुकली जराशी जणू कांता कमनीय
शांत निवांत जळात रूप निरंखत जावे
सुख अनन्य इथेच सारे साठवून घ्यावे

सारे सारेच सुरेख, कोण किती ते सरस
कसे सांगावे लावण्य, वितळलेले पारस
आरपार शिरले हे चित्र हृदयात माझ्या
अशी प्रेमात पडले बाबा चित्रकारा तुझ्या

असे रंग की भरावे कर्म कुंचल्याने सारे
जणू मोरपीस मनी अलगद फिरणारे
मीही अलवार राधा सारी बंधने तोडून
जीवलगी कृष्णसखा एक आत्म्याशी
जोडून

दि.१३/१०/२०२०
सायंकाळी ७.२३ वा.



## (२)
## राधा श्यामबिंब आहे

जळ भरण्या आले इथे
यमुनेच्या तीरी
मोरपंख दिसला मी
हरपले हरी

निळ्याजांभळ्या छटेचे
वस्त्र अंगी ल्याले
मन माझे हरीमय
कधीचेच झाले

काठ शांत शांत नदी
घट मौन राहे
मन माझे तुझ्यासंगे
बोलण्यास पाहे

तू सदाच राधेच्या
तनमनात आहेस
तूच वाणी तूच दृष्टी
जीवनात आहेस

पहा मला तूच क्षणी
तुझी प्रीत मी रे
वेणू तुझी वाजविता
तुझे गीत मी रे

सूर सप्त अंतराळी
श्याममय होई
एक सूर वेगळाच
राधा होत जाई

त्या तुझ्या किरीटी जो ना
मयुरपंख आहे
राधा अलवार त्यात
स्वतःस गुंफवे

अधरी धरीशी बासरी जी
राधा सूर आहे
हृदयी माला वैजयंती
राधा दोर आहे

राधा एक शरीर नाही
तत्त्व प्रेम आहे
राधा काय वेगळी का
श्यामबिंब आहे

दि.०४/०३/२१
सकाळी ०९.०० वा.



## (३)
## निळी मदमस्ती

निळ्या पांघरून नभाला सखी
धरती झाली निळी श्याम सखया परी
निळ्या डोंगरांची गडदशी निळाई
मनी रत्ने नीलम पेरून जाई

अशी ही सकाळ कशी धुंद झाली
मस्तीतली रात अशी मंद झाली
जळातील प्रतिबिंब झाले निळे
मला रंग माझाच नाही कळे

जरी वनराजी हरित हिरवाई
निळी पारदर्शक पांघरून निळाई
जणू वाटते पाचू नीलमची गुंफण
इथे जाहला नील सुंदर कण कण

नीलयम सदने उंच शिखरे तयाची
खगांची विहारे निळ्या या आकाशी
निळे चांदणे निळ्या स्वप्नकोशी
निळी मदमस्ती निळी मदहोशी

ना संपो कधी  नवलाई निळ्याची
निळ्या रंगी राधा नि मीरा बुडावी
निळ्या जाहल्या भावना नीलपंखी
निळे सूर पाव्यातुनी घुमताती

दि.२०/०७/२१
सकाळी ०९.३२ वा.



## (४)
## ही अनुप्रीती

विसरून तनमन
शुद्ध हरपली
तू मी भावना
अलगद लोपली

राधा शुद्धा
हरिसी मेळवून
तत्त्व प्रीतीचे
अंतरी मिळवून

तुझ्या सुरांनी
दिव्यत्वाची
मजला येते
अशी प्रचीती

राधा लौकिक
कृष्ण अलौकिक
मीलन ऐसे
अतुल्य आत्मिक

विसरून साऱ्या
रूढी न रीती
राधा मोहन
ही अनुप्रीती

प्रेमाची परिभाषा
वेगळी
राधाकृष्ण ही
वीण आगळी

मी विरले मुरले
मनी तुज भरले
मी तुलाच स्मरले
कृष्णातची उरले

सख्या तुझी ही
राधाराणी
तुझ्यात आहे
सामावुनी

दि.३०/०८/२१
सकाळी ०९.२१ वा.



## (५)
## जिथे स्वर श्रीहरी

ती सावळी श्याम बासरी
विसावते हरी अधरी
अमृत मोहक सूर सुंदरी
झुले हरिश्वासावरी

दैवी स्वर मग लेऊन येते
अलंकार तनुवरी
दिगंत स्वर ते पसरून जाती
मुग्ध वसुंधरेवरी

राग छेडीती अनुरागाचे
मजले वरचे वरी
उदात्त अनुदात्ताच्या संगे
उठती स्वरांच्या लहरी

सुख आरोह नि अवरोहही जिथे
सुखावती नित उरी
हरी श्वासाचे सूर रंगती
नंदनवन भूवरी

स्वर्ग उतरतो अवचित खाली
सुर वर्षावी सरी
विसरून सारे जीव रंगती
जिथे स्वर श्रीहरी

आनंदाचे परमानंदी
सूर असे खरोखरी
फिकी त्यापुढे वेदवचनेही
फिकी फिकी वैखरी

भाग्य लाभते आत्म्याला ते
परमात्याच्या करी
जन्म सुफल तो होईल मीही
होय श्याम बासरी

दि.२१/१०/२१
सकाळी ०८.११ वा.




## (६)
## वाटे राधा निळ्या बिलगली

निळा समुंदर निळेच पाणी
निळाई पसरे निळ्याच गगनी
निळे किनारे निळसर गाणी
निळ्या विशालशा नीलम स्वप्नी

क्षणात वाटे कृष्ण निळाई
नीलकंठ शिव शंकर होई
निळ्या दर्पणी नील कमळ हे
मुखा निखरता बिंब नितळ हे

रंग वेगळे चढती मनावर
निळ्याशार पापण्याही सुंदर
मिचकून थोडे दार मनाचे
निळे प्रेम लाभते निरंतर

हातामध्ये धरुनी हात
जशी निळ्याच्या राधा साथ
किनाऱ्यावरी जलराजा नि
भूमीमध्ये गूज अगाध

जाग निळी ही पेंग निळाळी
मध्येच नभी या स्वर्ण झळाळी
निळे शब्द नि निळ्याच वेळी
निळ्या राजसी गाठ ही जुळली

निसर्गातली जादू किमया
उतरून आली निळ्या कागदी
निळा कुंचला फिरला अलगद
वाटे राधा निळ्या बिलगली

दि.२६/१०/२१
दुपारी ०४.४१ वा.



## (७)
## निरभ्र माझे जीवन होईल

निरभ्र आकाशातून उमटे
छवी तुझी श्रीरंगा
किती बुडाले तरीही लिंपिन
केवळ तुझ्याच रंगा

अर्धोन्मीलित नयनांमध्ये
विश्व सारे सामावे
मोरपिसाच्या स्पर्शामध्ये
स्पर्श तुझे जाणावे

मुकुट मस्तकी स्वर्गाचा अन
पाताळाचे पाय
हृदयी नांदते पृथ्वी सारी
देवकी यशोदा माय

इथे मिळाली तुला रुख्मिणी
भामा जांबुवती काय
राधा मीरा अजब रसायन
कृष्ण वितळुनी जाय

कधी भरते आभाळ ढगांनी
हुरहूर उगा जिवास
निरभ्र आकाशातून तूचि
भरल्या ढगा तव आस

निरभ्र माझे जीवन होईल
तूच तू असता आत
जसा बासरीवरती शिरी या
फिरू दे तुझाच हात

दि.०९/११/२१
दुपारी ०४.२४ वा.



## (८)
## युगायुगांतून राधाकृष्णचि

कर राधेचा घे करी कृष्णा
संगे गोपिका मळा
कुंजवनी बघ रंगे मीलन
रम्य होई सोहळा

तुझी नि तिची ही प्रीत अनोखी
साक्षी आम्ही सगळ्या
आधी वाटे हा कृष्ण आमुचा
परी वाटा वेगळ्या

तू तर आहेस साऱ्या साऱ्यांचा
भाव जसा मनी पाही
राधा वेडी तुझ्याच साठी
ती ती नच राही

अस्तित्वाच्या खुणा ती विसरून
कृष्णमय उरली
राधा प्रीतीच्या किती रुढींवर
मात जणू ठरली

भावभक्तीच्या आम्ही गोपिका
प्रेमभक्तिमय राधा
कृष्ण सख्या रे हे जगदीश्वर
साथी राधेचा व्हावा

अजरामर ही होय कहाणी
प्रीत जगावेगळी
राधा देहापलीकडची अन
कृष्ण कथा आगळी

युगायुगांतून राधाकृष्णचि
भरून उरतील जेव्हा
अनुरागाच्या पावन नात्या
स्पर्श होऊ दे तेव्हा

दि.२९/११/२१
सकाळी ०९.४६ वा.



## (९)
## राधा हरीची झाली

बस आज सांगते मी
माझ्या मनातले तुज
शब्दांविनाच कळते
प्रेमात नाहले गुज

राधा तुझीच आहे
सृष्टी तुझीच कृष्णा
मी प्रीत पाहताना
दृष्टीस तुझीच तृष्णा

बेचैन होते राधा
नाही कुठे दिलासा
तू एक तूच माझा
रे मोहना विसावा

पाहे मी जिकडे तिकडे
दिसते छबी तुझीच
डोळ्यांस थोडे मिटता
मूर्ती उभी तुझीच

ही ओढ कसली मजला
ओढत आणते रे
रीती जगाच्या राधा
कुठे आता जाणते रे

हरी हा गवसला मज
राधा हरीची झाली
रे श्याम सावळ्या रे
मज बाधा हरीची झाली

कुजबुज वनात झाली
कुजबुज जनात झाली
राधेस पिसे लागे
चर्चा अमाप झाली

मजला नकोच काही
राधा ही कृष्ण होई
नातं युगायुगांचं
राधेत कृष्ण पाही

दि.०३/१२/२१
रात्री १०.२१ वा.



## (१०)
## संगत सदा तुझी ती

संगत तुझी नि माझी
जणू सूर बासुरीची
त्या ताना छेडीशी तू
मी मुग्ध अधरीची

हातात मजसी घेऊन
ओठास लावशील तू
वेताची वेणू मी रे
सूर सप्त छेडशील तू

श्वासासावे तुझ्या त्या
मी माझे श्वास घेईन
गाणे तुझे प्रिया रे
तार सप्तकात नेईन

आलाप तुझे माझ्या
रोमात रोमतील
आरोह स्पंदनांना
वेगात स्पंदतील

अवरोह ते तुझे मी
जवळी मनात ठेवीन
ते श्वास खोल खोल
उ:श्वास आत नेईन

निज आत्मभाव तूही
उतरून तूच येशी
मिटता मी नयन माझे
तू साद कैशी देशी

सहजीच धरता तू मज
उमटून गाणे यावे
पावा म्हणून कोणी
मज तुजसवे पुजावे

संगत सदा तुझी ती
हृदयात श्वास व्हावे
निःश्वास ही तुझ्यातच
माझे विरून जावे

तू सावळा हरी रे
मी राधिका सुरांची
तुज स्पर्श अंतरात
मज धन्यता सुरांची

दि.०२/१२/२१
रात्री ०८.२१वा.



## (११)
## राधा नाही उरलेली

असे कोणते रंग श्रीरंगा
तुझ्या नि माझ्या प्रीतीचे
असे कोणते ग्रंथ प्रियवरा
तुझ्या नि माझ्या रीतीचे

जातील मिसळून एकमेकातून
सुरही आपुले एक जसे
तुझी बासुरी राधा होईल
मीलन वेगळे सांग कसे

रूप दोन वेगळे कधी नच
विचारून पहा तुज हृदया
दर्पण पाहते दिसतो कान्हा
मोहन माझ्या रे सखया

दो रंगांचे एकरंग हे
राधा मोहन प्रिया प्रिया
राधे राधे म्हणा कुणी की
कुणी कृष्ण हो कृष्णप्रिया

ह्या नात्याला कसले बंधन
रेशीमधागे जुळलेले
कसे कळावे अनुबंधही हे
आणिक कैसे फळलेले

मी मिसळून तुजमध्ये गेले
राधा नाही उरलेली
कळेल त्याला ह्या हृदयातून
प्रीत अनोखी स्फुरलेली

दि.२१/०१/२०२३
रात्री ०८.४३ वा.




## (१२)
## हो प्रीत श्रेय कर्म

किती गोड गोजिरे हे
रूप कुमार वयाचे
ही राधा साजिरी अन
मोहन रूप त्याचे

ते कवळेपण नाजुक
ते तेज किती साजुक
हे देह जरी मानवी
दैवीच तत्त्व भावक

डोळ्यात चमकणारे
किती बोल स्पष्ट दिसती
ना बोलताही दोघे
हलकेच दिव्य हसती

अधरावरी ती मुरली
राधा सदैव झुरली
त्या श्याम सावळ्याच्या
कणकण कणात उरली

शृंगार त्याचसाठी
सात्विक प्रेम गाठी
आले धरातलावर
नवी रीत देण्यासाठी

नुसत्या ना मूर्ती या तर
हे मूर्त प्रेम पाहे
अर्धांगिनी न राधा
तरी राधाश्याम आहे

कळणे न सहज मर्म
प्रेमाचा गहन धर्म
जो जाणतो हे वर्म
हो प्रीत श्रेय कर्म

दि.०८/१२/२१
सकाळी १०.५९ वा.



## (१३)
## राधामोहन सूर

धुंद जाहले प्रिया सुरांनी
किती मधुर स्वरगाण
अर्धोन्मीलित नयनांमध्ये
सप्तसुरांचे वाण

सांग तुझ्या रे अधिक जवळची
मी की बासुरी प्राण
तुझ्या मनातील हवे मला रे
वेगळे केवळ स्थान

तल्लीन होऊन आळवीशी तू
स्वर्गामधले सूर
तो तो माझ्या प्रीत नदीला
ओसंडून ये पूर

सुरात वाहून जाते मीही
विसरून सारे भान
नकळत राधा देते मुरलीस
अवचित हळवा मान

कधी वाटते माझ्यासाठी
धरीशी तिला तू ओठी
तुझ्या नि माझ्या प्रेमगाथेला
तीचीच रेशीमगाठी

अशी सुरांची पक्की गाठ ही
जुळूनी अंतःकरणे
तू मी, मी तू रमलो सुरातच
सुरात प्रीतही उरणे

कधीही वाजवील कुणी बासुरी
राधामोहन सूर
युगायुगांती कधीच नसतील
राधाश्याम हे दूर

दि.०४/१२/२१
सकाळी ०८.२३ वा.




## (१४)
## मेंदीत भाव माझे

ये रेखीतो करी तव
मंगल सुरेख रेखा
उमटेल ठळक त्यातच
माझी ग प्रीत देखा

मेंदीत भाव माझे
ते मोरपीस फिरावे
हे क्षण असेच आपुले
पृथ्वीतली उरावे

किती रेशमी हा स्पर्श
मनी उमटे माझ्या हर्ष
न्याहाळून पाहताना
अलवार भावोत्कर्ष

तो मोर ती मयुरी
तो चंद्र ती चकोरी
प्रेमात भारलेली
ही सांज बघ ना सारी

ही वाट वेगळी अन
ही प्रीत वेगळी ग
वरवरची गोष्ट नाही
चिर खोली आगळी ग

क्षण भारतात वेडे
येणे तुझ्यामुळे हे
मज पाठी विश्व सारे
भुलतो मी तुजवरी गे

दि.०९/१२/२१
सकाळी ११.११ वा.



नयनांमध्ये तुझ्या काळजी
उगाच दिसते मजला
नाही कुणाचा श्याम वेडुले
तुझाच सांगे तुजला

असल्या असंख्य किती गोपिका
गोपही सखे ते माझे
परि मनावर राधे कायम
असते गारुड तुझे

## (१५)
## जय जय राधेश्याम

काय जाहले राधाराणी
बिलगून गेली मला
कसली चिंता सांग बरे तू
तुझ्या कोवळ्या मना

सुकुमार चेहरा तुझा मोहिनी
मोहन मी भाळतो
तुझी प्रीत दडवुनी मनात ग
प्रेम रीत पाळतो

आलो येथे कार्य साधण्या
राधा जीवनी आली
अवताराची अशी मधुरतम
भक्तिप्रेरणा झाली

नको काळजी नको ग चिंता
तुझाच राहील श्याम
युगायुगांतून मंत्र ऐकू ये
जय जय राधेश्याम

दि.२०/१२/२१
सकाळी ०६.५७ वा.



## (१६)
## भाव पिसारे हलके

कुंजवनी तू वाजव मुरली
खोडकर रे कान्हा
आज राधेच्या मनात खोडी
संगत असर पहा ना

पंख हंसाचा शुभ्र मुलायम
फिरवीन गालावर
लपून छपून मी चालेन सखया
तुझ्याच तालावर

तुला हवेसे स्पर्श हर्षाचे
नाजुक तरलसे बंध
अवखळ खोड्या तुझ्या नि माझ्या
असे वेगळे रंग

स्वर छेडती तुझे मनावर
तरंग हलके हलके
हलके जणू हे मोरपीस की
भाव पिसारे हलके

तुला पाहण्या सूर ऐकण्या
पशुपक्षी बघ जमती
अबोल भाषा संगीताची
दिव्य स्वरावटी रमती

वेडी राधा वेडा मोहन
वेडी प्रेमकहाणी
भक्तीमूलक प्रीती ऐशी
निभवे राधाराणी

दि.१५/१२/२१
दुपारी ०२.३८ वा.



## (१७)
## मने फुलासम डोलून जातील

हृदय मांडले तुझ्या पुढ्यात मी
काढ अशी राजसा तू नक्षी
प्रीत असू दे तुझ्या नि माझ्या
प्रीतखुणांची अशीच साक्षी

समज मनाला माझ्या कागद
रंग तुझे तू मिसळून घे ना
सुरेख मजवर फिरव कुंचला
तुझ्या भावनांचा अलगद ना

कागद होईल तलम रेशमी
रेषा रेषा उमटून येतील
चित्र मनातील घडेल माझ्या
रंग मनाचे जुळून येतील

शब्द गोंगाटा विसरून जातील
विरून जातील विरह भावना
चित्र देखणे नक्षी साजूक
अजरामर ती प्रीत साजणा

आसुसलेली प्रिया तुझी बघ
नक्षीसाठी जन्मोजन्मी
यावी उतरून तुझ्याच हातून
राधा व्हावी चित्रातुन मी

तल्लीन व्हावे प्रीतसोहळे
किती अबोलसे रंग बोलती
शब्देविण बघ बोलून जातील
मने फुलासम डोलून जातील

दि.२७/१२/२१
सायं ०७.०२ वा.



## (१८)
## नाद जडू दे जीवास कायम

नाद ऐकुनी तुझा मी बावरी
वेडी तुझी प्रियतमा
जगास विसरून तुझीच होते
राधा श्याम तन्मना

सुरात नादावली गात्रे अन
मनात धुंदी पुन्हा
जगास वाटे राधा वेडी
काय सांग मज गुन्हा

नाद मला रे तुझाच मोहन
मोहून मी जाईन
मोहामध्ये अशा वेगळ्या
मोहवुनी मन पाहीन

नाद सुरांचा की तव प्रीती
भक्ती नाद उसळतो
साद ऐकुनी सागर वेडा
सरितेला मिसळतो

काय तिलाही नाद आगळा
वाहत सुटते जणु
ऐकू येते का सांग तिलाही
तुझीच मधुरा वेणु

नाद जडू दे जीवास कायम
राधा तुझीच राहील
स्वर्ग धरेचे मीलन आगळे
युगायुगाला होईल

दि.०५/०१/२२
रात्री ०९.११ वा.



## (१९)
## राधा ही कृष्ण झाली

मी जाणले हरी रे
तू आत बाहेरी रे
देहास उपाधी माझ्या
राधा की मुरारी रे

प्रतिबिंब बिंबासम की
बिंबच प्रतिछाया
रे सांग राजसा ही
कसली विमोह माया

हरवून बसते मी की
गवसून जात आहे
मी पाहते जयाला
ते तत्त्व तूच आहे

देहास किती सीमा
मन व्याप्त तुझ्या भावे
जो अंश तुझा नित्य
मज अंतरात्मा आहे

वर पाहता मी गौरी
तू कृष्ण सावळा रे
प्रतिबिंब पाहण्याला
तू संगी मज आला रे

नाते कसे म्हणू मी
किती जन्म फळा आले
राधेस कुंजरानी
मन कोवळे मिळाले

त्रैलोक्य होई गोळा
ना अर्थ शास्त्र सांगे
ही प्रीत तुझी माझी
व्याख्येविनाच रंगे

रमल्या युगायुगांतून
गाथा तुझ्या नि माझ्या
राधा ही कृष्ण झाली
की कृष्ण होई राधा

दि.०१/०२/२०२२
०५.३८ वा.



## (२०)
## राधेचा राधेश्याऽऽऽम

तो साथ देणारा माझा
प्रियवर राजा मुरलीधर
मी होणे राधा भाग्य
प्रीतीची आगळीक ही तर

तो आत सखोल राहता
मज दिसे जिथेही पाहता
मी स्तंभित होऊन जाते
ते सुरम्य दर्शन होता

तो सूर अनाहत छेडीत
संगीत मधुरतम गातो
अन वेणुवर बोटांनी
अलगदसे नाद फिरवतो

तो गुंतून माझ्यामध्ये
जणू राधामय की होतो
परि राधेला नवजीवन
मज कृष्ण सावळा देतो

तो मोहन मोहून जातो
की मला मोहवीत पहातो
मोहाचे तोडून धागे
मोहक पथावर नेतो

तो जीऽऽऽव, नव्हे प्राऽऽऽण
तो हृदय, नव्हे आऽऽऽण
तो जगण्याऽऽऽचे कारण
तो माझा राधेश्याऽऽऽम
राधेचा राधेश्याऽऽऽम

दि.१८/०१/२०२२
सकाळी ०८.५५ वा.




## (२१)
## एकमात्र मी तरंग

कुणी म्हणावे कृष्ण सावळा
कुणी मुकुंद श्रीरंग
सृष्टी सागर कणकण माझा
एकमात्र मी तरंग

सूर छेडीतो आदी अनादी
जुळतील अंतरंग
सप्तसुरांतून वाहत येईन
एकमात्र मी तरंग

जीव जीवाचे किती बुडबुडे
सागरतळी उमंग
नव्या जीवाला नवी चेतना
एकमात्र मी तरंग

माझ्याकडे जे येऊ इच्छिती
भक्ती भाव हवा दंग
ते मी मी ते अभिन्न होऊन
एकमात्र मी तरंग

प्रीत बासुरी प्रीत ही राधा
आणि समर्पण मीरा संग
छटा वेगळ्या वेगळे रंग
एकमात्र मी तरंग

वैकुंठाची तृप्ती येथे
अन वसुधेचा रम्य सुगंध
नाद अनाहत उमटून येता
एकमात्र मी तरंग
एकमात्र मी तरंग

दि.२९/०१/२०२०
सकाळी ०९.३७ वा.



## (२२)
## समाधान

काय लाभते राधेला
कुणी प्रश्न हा पुसावा
मज लाभे समाधान
मोहनची तो दिसावा

मी सूर ऐकुनी वेडी
होते त्या क्षणक्षणाला
मज काय विचारता कोण
श्याम पुसा मना मनाला

ते रूप साजिरे त्याचे
मी हरवून सारे जाते
जे त्याचे त्याला देता
मज समाधान लाभते

तो वेणू वाजवतो की
मज काळजास छेडीतो
शब्देविण राधेला
स्वर स्वरातून काढीतो

मी उरतंच नाही तेव्हा
लय राधेशयाम ही होते
नूरताना उरलेली
मी समाधान पावते

दि.१४/०३/२०२२
सकाळी ११.५२ वा.



## (२३)
## राधेश्याम रंग पावन

तुझ्याच रंगामध्ये रंगून
राधा मिसळते श्रीरंगा
तुझ्याच प्रीतीचा रंग लागतो
रोज राधेच्या अंगा

किती कोणते रंग सांगू मी
मज माहीत तू रंगा
रंग सावळा सखोल प्रीती
राधेश्याम नीट संगा

अवकाशातून उधळूत जातो
दिनमणी रंग सुनहरे
निशापती दे रंग चंदेरी
पसरून अलगद सारे

अंग उषेचे रंगीत रोजची
रोज रंगाळते राधा
अन्य न काही माहीत तिजला
रिवाज रंगीत साधा

डोळ्यांमध्ये रंग मुरारी
अंतःकरणी मोहन
स्वप्नं सारे हे दामोदराचे
कृष्ण राधेचे जीवन

जिकडेतिकडे आसमंती मज
रंग तुझाच रे दिसतो
साऱ्या साऱ्या रंगांमधुनी
मिश्किल श्रीहरी हसतो

अशी खेळली राधा होळी
रंग जडविले मनभावन
देह उरो वा संपून जावो
राधेश्याम रंग पावन

दि.१७/०३/२०२२
सकाळी ०७.५७ वा.



## (२४)
## राधा तुजसंग चालली

कोण येई जीवनी या
ते कसे सांगेल कोण
साथ जो देईल नेहमी
एकचि ते नाही दोन

का हवे शब्दात गाणे
ते कळावे तुज असे
पाहता मी लोचनातून
म्हणणे माझे तुज दिसे

हासणे ओठातले हे
पोचवी मज मोद जे
रुसलेल्या राधेस कृष्णा
जाण तू मज तूच रे

हे हृदय केवळ तुझे
श्वासही केवळ तुझा
आस तू मज ध्यास तू
विश्वासही केवळ तुझा

भावनांचा तू भुकेला
प्रीत भक्ती डोलली
जगरहाटी सोडुनी ही
राधा तुजसंग चालली

मी सदा आहे तुझी
तू श्याम माझा जाहला
प्राण माझा रे प्रिया
मी चरणी तुज बघ वाहिला

दि.०८/०६/२०२२
मध्यरात्री ०२.४१ वा.



## (२५)
## एक राधा एक श्याम

चालता तव संगती
पदचिन्हं संगे उमटती
भाव लाटां भरती येता
हृदयसागरी उसळती

स्पर्श तो छेडी मनाच्या
तारा नाजूक बावळ्या
धून ये ऐकू जरासी
उमलती जाई कळ्या

उतरत्या सांजेला येथे
रोज आपण भेटतो
प्रीतगिरीवर रोज रोजचि
हर्ष वाटून साठतो

पाहू दे पाऊल चिन्हे
आपुली येथे अशी
वाटते ही प्रीत आपुली
थांबली या मातीशी

क्षण न संपून जावे कधीही
भारलेली वेळ ही
श्याम जवळी असता राधा
बहरलेली वेल ही

काय नाते कोण जाणे
प्रीतीचे कसले हे धाम
मूर्त प्रेमाचीच होई
एक राधा एक श्याम

दि.०९/०६/२०२२
सकाळी ०९.४३ वा.



## (२६)
## धुन माझी जी अधुरी

कुंजवनी राधिके ग छेड बासुरी
धुन माझी जी अधुरी, कर ना तू पुरी ।।
राधे, कर ना तू पुरी ।।धृ।।

जीव जीव मजवरी ग, असती विसंबीले
मी माझ्या राधेसंग, क्षणा थांबवीले
नाद एक उमटतो राधेश्याम उरी...
धुन माझी जी अधुरी, कर ना तू पुरी ।।
राधे, कर ना तू पुरी ।।१।।

सांज जरा टेकलेली, बघ क्षितिजावरी
प्रीत तुझी ह्रदयी माझ्या भरली पुरेपुरी
संवाद हे आकारती, शब्द मूक जरी
धुन माझी जी अधुरी, कर ना तू पुरी ।।
राधे, कर ना तू पुरी ।।२।।

काय तत्त्व राऽऽधा ही, का बुडतो हरी
मी अनादी अन अनंत, सांगे वैखरी
कोण मीच विसरू होते, प्रिये खरोखरी
धुन माझी जी अधुरी, कर ना तू पुरी ।।
राधे, कर ना तू पुरी ।।३।।

मी अपूर्ण, नाही पूर्ण, तुजविण राधे
राधेविण श्याम नाही, सूत्र हे साधे
तुजसम नाही समर्पण, तूच कापुरी
धुन माझी जी अधुरी, कर ना तू पुरी ।।
राधे, कर ना तू पुरी ।।४।।

दि.०४/०७/२०२२
रात्री ०८.४२ वा.



## (२७)
## होईल श्यामसुंदर

मुख पाहू दे जरासे, राधे मनी तू ठासे
का चैन हरपते मज, सर्वत्र तूच भासे

येतो असा कुठूनही, राधेस भेटण्याला
हा कृष्ण गुंतलेला, तुज संग राहण्याला

या कुंजवनी घुमतो, पावा मधुर वेडा
ह्या श्याम सावळ्याच्या,
पडला मनास वेढा

वाटे सदा पहावे, राधेसवेच जावे
ही प्रीत वेगळी ग, आपुल्या मनास ठावे

उचलून पाहू दे मज, मुखडा तू झाकलेला
उघडून दे ना थोडा, पडदा तू टाकलेला

प्रत्यक्ष प्रीतरूप, तू प्रेममय स्वरूप
हे भाग्य आहे माझे, तू मजसी अनुरूप

राहील या धरेवर, ते भाळलेले अंबर
राधा असेल मनी तर, होईल श्यामसुंदर

दि.२२/०७/२०२२
सकाळी ०६.३९ वा.




## (२८)
## आस प्रीतीची फक्त तुझी

तुझे नि माझे नाते कसले
शब्दामध्ये कसे मांडू
फुलात दडला सुगंध सखया
जगतामध्ये कसा सांडू

नजर ओळखे नजरेमधले
शब्द जाहले सारे पारखे
काहीही मी बघते तरीही
रूप सावळ्या दिसे सारखे

कशास गोपींसाठी असूया
तूच तू माझ्या मनी पुरा
तूच सांगशील राधेविण हा
मोहन कधीही बघ अधुरा

फूल जाईचे नाजूक किती हे
तसेच काळीज रे माझे
दळीपाकळी खुलते याची
तुझ्याचसाठी सुर गाजे

नको मुकुंदा कधीच विसरू
राधा वेडी तुजसाठी
देह असो वा मन, आत्मा हे
सारे समर्पित तुजसाठी

मला न माहीत या जन्माचे
जन्मोजन्मी मी फक्त तुझी
काही नको मज संसारातील
आस प्रीतीची फक्त तुझी

दि.१९/०८/२०२२
सकाळी ११.४३ वा.



## (२९)
## कृष्णाची राधा होता

पुसताच कोणी येथे
राधा कुठे हो विरली
राधा श्याम हाती
पहा झाली को हो मुरली

स्पर्श सावळ्याचा
बाधा तिला की झाली
अंतरात नाम श्याम शयाम श्याम
राधा श्याममय झाली

कुंजवनी रास
वेगळीच आस
जोड जीवा जीवाची
जोडी अजोडाची

कुणाला ना कळाले
हे नाते कसे झाले
गोड काही भास
ह्रदयी उमलू आले

आजही मी राधा
तू कृष्ण राधेचाच
राधेश्याम राधाकृष्ण
सूर राधेचाच

आजही ती गाथा
जगतात कुणी गाता
राधा रे ना निमाली
कृष्णाची होता होता
कृष्णाची राधा होता

दि.२८/०२/२०२३
सकाळी ०७.४४ वा.



## (३०)
## राधा सूर होत जाई

किती ठरवावे कृष्णा
तुझ्या विना ना जीवन
माझे प्रतिबिंब बोले
श्याम सावळा मोहन

बसता मी तू बसतो
संगे निवांत रे माझ्या
विचारात तूच तू रे
चित्ती श्यामरंग माझ्या

कधी यमुनेस जाता
जळी कृष्ण भासतो ना
तिचे जळही सावळे
तरंगात हासतो ना

वर आकाशी पाहता
रंग त्याचाच पसरे
तन मन सावळ्याचे
राधा अस्तित्व विसरे

राधा राधा कोणी म्हणे
स्वर कृष्ण कृष्ण होई
कृष्ण कृष्ण म्हणताना
राधा सूर होत जाई

दि.१३/१२/२०२२
सकाळी ०८.५३ वा.



## (३१)
## राधा तुझीच

हे श्याम मुरारी
कमलिनी तव करी
तशीच राधा
युगयुगे बावरी

मी घेते मिटुनी
नयनदले
मज हृदयी प्रीतीचे
राजीव उमले

हा असा दिलासा
स्पर्श सुखावे
राधेसंगे मोहन
दोन तरी ते एक दिसावे

अनमोल क्षणांना
कसे सावरू
सांग सख्या
मज कसे आवरू

हे नाते आपुले
नाही येथले
तरी रम्यता
आपण तिथले

नको पुन्हा रे
विरह सावळ्या
अलगद फुलू दे
मज मनी जुई कळ्या

राधा तुझीच
तू राधेचा
नाद ऐकूनी
घे मुरलीचा

दि.०२/१२/२०२२
रात्री ०८.१९ वा.



## (३२)
## पारिजाती ओघळणे

तू मोरपिसासम अलगद फिरवीशी
भावपिसारे मुलायम
न सांगता तू जाणून घेशी
मन माझे रे कायम

केस मोकळे श्वास मोकळे
मोकळे आकाशही हे
मन मोकळे तुझ्यासवे हे
मंद धुंद प्रकाशही

काय सांगशी रोज नव्याने
नवीच राधा होते
नवी नवाळी श्रीकृष्णाची
यमुना नवी वहाते

झिरपून येते शुभ्र चांदणे
झाडे पानांमधुनी
किती युगे संपली तरीही
राधेश्याम रे अजुनी

प्रीत ही कसली रीत ही कसली
कुणा न कळली कधीही
कळली तरीही आपुल्या परि
कुणा न वळली कधीही

नित्य चालू दे तुझे माझ्यातून
माझे तुझ्यातून जगणे
सोडून सारे होत कुणाचे
पारिजाती ओघळणे

दि.२०/११/२०२२
सकाळी ०७.३४ वा.



## (३३)
## एकरूप मग दोन मने

तूच शिकविले सुर जगण्याचे
माझ्या मनमोहना
नितळ जळातुन भाव उमटले
झुळझुळ झरे कानना

दिव्य स्वरांच्या मोहामध्ये
सृष्टी सारी कृष्ण प्रिया
तुझीच मीही जन्मोजन्मी
नाव मिळाले कृष्णप्रिया

श्यामरंगी रंगून सांज ही
यमुनातीरी रेंगाळे
शब्देविण संवाद चालतो
भाव पारिजातक ओघळे

स्पर्श तुझ्या वेणूमधले
तुझे अधर प्रियवर त्यावर
मीही टेकवीत अलगद टिपते
सूर भारले जे त्यावर

क्षण दोघांचे अमोल निव्वळ
आत्मरंगाचे गीत बने
जुळून येता आत्मबंध बघ
डोलून जाती दोन मने
एकरूप मग दोन मने

दि.०८/११/२०२२
सकाळी ०९.५३ वा.



## (३४)
## मन राधे राधे झाले

देह राधेचा जरी ग
श्यामरंगी तू बुडून
राधा होऊन मी पाही
जावो किमया घडून

छवी घेतलीस माझी
रूप देखणे सुंदर
असा मोहून मी जाता
वाटे श्यामही सुंदर

सूर वेगळेच आले
कानी बासुरीचे माझ्या
किती नाजूक ते झाले
भावनेत चिंब तुझ्या

आज कळली मला ही
प्रीत सखोल राधेची
डोळे बोलतात सारे
व्यथा बोलकी राधेची

देह कृष्ण सावळ्याचा
मन राधे राधे झाले
जन्म भारावून गेला
चित्त आधे आधे झाले

दि.१२/१२/२०२२
सकाळी ०९.१३ वा.



## (३५)
## धुन ऐकू येवो श्याम

मी धूप कृष्ण झाले
गंधात त्या नहाले
नाहीच कळले काही
लौकीकही निमाले

मी मूर्त तुझी होऊन
अशी एकरूप झाले
हालाहलास अमृत
समजून श्याम प्याले

मी दीपज्योती होऊन
उजळून जळुनी गेले
नाते तुझे नि माझे
कैसे जुळून आले

मी भोग्य भोगकारी
मी शुद्ध नामधारी
उरले न द्वैत काही
मीरा आणि मुरारी

धुन ऐकू येवो श्याम
मन ऐके श्यामनाम
तल्लीन मीरा होते
मज तूच एक धाम

दि.२६/०३/२०२३
सकाळी ०७.२२ वा.




## (३६)
## आल्हादाचा रंग गुलाबी

मंद्र गुलाबी तंद्र तंद्री ही
सुंदर पाने बहराची
रंग रूप किती विलोभनीय हे
मेजवानी नित प्रहराची

अलगद चढतो रंग मनावर
दंग करून सोडतो क्षणी
क्षणात माझा असताना मी
प्रियेचा अवचित होतो झणी

जळात उतरून परी गुलाबी
क्षितिजावरती रेंगाळे
नभांगणातही रंग गुलाबी
मुशाफिरी करतो चाळे

लाडिक लाडिक गोड गोडवा
रंग गुलाबी गालावर
प्रिया लाजते होत गुलाबी
दैव गुलाबी भाळावर

आल्हादाचा रंग गुलाबी
श्याम निळाई विसरे हा
राधेसंगे होत गुलाबी
कुंजवनातून पसरे हा

दि. ०३/०४/२०२३
सकाळी ०७.५२ वा.




## (३७)
## या प्रेमाची अलौकिक भक्ती

इवले इवले राधा कृष्ण
रूप देखणे चित्ताकृष्ण
गोडगोडवा मधुर माधुरी
कधी न संपे अशी शिदोरी

मनमोहन ती रूपगोजिरी
दामोदराशी अशी साजिरी
चंद्र तो ती असे त्याची रोहिणी
जगता घालती दोघे मोहिनी

हास्य कसे सांगा मापावे
सुहास्य वदने सदाची ध्यावे
इतके गोडुले स्वरूप न्याहाळून
या नयनांनी अमृत प्यावे

दिव्य रास ही चाले नित्यची
नित्य इथे उमलती कांती ही
दूर क्षणातच होती कष्टे
दूर आणखी साऱ्या भ्रांती

प्रेम मूर्त हे बाळ गोजिरे
प्रीत झिरपते झऱ्यासारखी
कितीदा पहावे नाही तृप्ती
या प्रेमाची अलौकिक भक्ती

दि.०५/०४/२०२३
सकाळी ०७.३२ वा.



## (३८)
## **रानोमाळी फुलल्या ओळी**

लंब तुरे हे फिके जांभळे
लोलक राधेचे
शोभून दिसती कर्णडूल हे
सोज्ज्वळ साधेसे

हिरव्या हिरव्या कुंजवनातील
रास सावळ्याची
ही राधेच्या अंतरातली
आस सावळ्याची

फुलून आल्या जरी स्वर्गातून
नजर धरणीवरती
कुणी अप्सरा पुष्पतुऱ्या ह्या
सौंदर्या भरती

उगा पहावे ऋतू सहाही
अलंकार त्याचे
रानोमाळी फुलल्या ओळी
हुंकार असती ज्याचे

साठवून ते रंग निराळे
रूप वेगळाले
क्षणात लखलख तेज उमटता
मालिन्यही पळाले

दि. १४/०४/२०२३
सकाळी १०.०३ वा.



## (३९)
## तुझ्या श्याम नीलरंगी

तुझ्या निळाईची भूल मला इतकी पडते
नकळत पाऊल हे तुझ्या सवेच अडते

किमया ही सारी सारी तुझी भुलवे जीवाला
लाभे निवांत निवारा माझ्या उनाड मनाला

तुझे नभ निळेशार नग निळे निळे फार
जळ निळ्याच गुणाचे, निळाईचा वारा गार

फुले उमलून आली निळ्या पाकळ्यातुनी रे
निळे काठ तलावाचे निळी नदी आतुनी रे

तुझ्या श्याम नीलरंगी नील राधा जणू व्हावी
एक तान निळी निळी, वेणू सूर निळे गाई

दि.३१/०५/२०२३
सकाळी ०७.५० वा.



## (४०)
## राधा होते समर्पणातुर

तू मनमोहन रूप मदनगुण
रंग निळा सावळा
मी राधा रे तुझी मोहिनी
अनुगुणी मजला लळा
तुझा रे जिवा लागला लळा

यमुनाकाठी असा विराजित
निवांत भूवरी तू बसलेला
पाय उभा टेकवून त्यावर
गुलाबहात हा असा झुकविला

प्रीत आपुली त्यात प्रकटते
तुझे नि माझे गंध साजरे
हळव्या नाजूक प्रीतकोशी या
क्षण सुंदरसे किती लाजरे

गवतफुलेही बघ आसुसली
तुझी चरणधुळ अंगी माखण्या
राधा होते तशीच उन्मनी
बंध आपुले सदा राखण्या

तुझ्या पदीचे मी हो नूपुर
अबोल घुंगुर अबोल ते सुर
स्पर्श तुझा दिव्यसा लाभता
राधा होते समर्पणातुर

दि.२५/०७/२०२३
रात्री १०.४३ वा.



## (४१)
## वर गोंदण कोंदण

तुझ्या वेणूचं गोंदण हातावर रेखीयलं
मोरपीस अलगद त्यात कस देखीयलं

युगायुगातून तुझ्या गोड नावाचा गजर
तुझे रूप शोधताहे साऱ्या दिशी ही नजर

तुझा पावा वाजला की साऱ्या वृंदावनी नशा
सुरावटी धुंद होती साऱ्या गोपीकाही तशा

तुझा भाव कणोकणी आत बाहेरीही तूच
माझ्या असल्याची खुण देह वर आत तूच

मनी गोंदविले तुला तुझ्या सावळ्या रुपाला
वर गोंदण कोंदण माझ्या जीवाच्या सख्याला

दि.२७/०७/२०२३
सकाळी ०८.२३ वा.




## (४२)
## का असा मी मोहित मोहन

हे नितळ सूर, ती नितळ राधिका
निर्मळ मन प्रांजळी
का असा मी मोहित मोहन होतो
सहजी राधामय पळी

गुंगतो जरी दंगतो तरी
अभिन्न ती नि मी
श्याम राधिका तत्त्व प्रेमिका
जोड अनोखी ही

प्रीत मिसळते सुरावटीतून
वेणु हर्षभरित
मयूर नाचतो आनंदाने
हरिणी सुर प्रेरित

ये यमुनेच्या तीरावरती
भारावली संगती
देहभान विसरुनी क्षणांची
सांजरास रंगती

मी मिटल्या नयनांनी देखीन
तुजसी राधे नित्यची
ही अनुरागी कथा वाटो परि
गाथा आपुली सत्यची

राधे राधे मनी जपता कोणी
सापडतो मी झणी
राधेश्याम हा मंत्र जागतो
भक्तीप्रेमाने जनी

दि. ११/०८/२०२३
सकाळी ०९.३२ वा.




## (४३)
## राधा आणिक श्याम

आज तुला मी सांगून गेले
गूज सख्या मनीचे
स्वीकारली तू भावसुमने ही
स्वप्नं खुले क्षणीचे

खोल नितळशा तरल भावना
तुझ्यासाठी दडल्या
आज सांजेला क्षितिजावरती
रम्य कथा घडल्या

वाचलेस तू नयनांमधले
प्रीतसुलभ सांगणे
आज नव्याने जणू वाटले
तुझ्यासवे जगणे

देशील का रे क्षण सुंदरसे
काही नको मजला
हळव्या श्रावण सरीत भिजवून
प्रीत देई तुजला

असे जपू रे नाते आपुले
राधा आणिक श्याम
युगायुगातून ऐशा गाठी
रेशीम धागे नाम

दि.१२/०८/२०२३
रात्री ११.११ वा.



## (४४)
## तुझ्या चरणी रंगले

आत्मरंग तू श्रीरंग
श्याममय अंग अंग
क्षणोक्षणी लाभो प्रिया
राधिकेस तुझा संग

साऱ्या आस तूच तू रे
सारे भास तूच तू रे
माझे आभास सगळे
प्रीतरास तूच तू रे

कुठे काय पाहू आता
जिथे तिथे तूच दिसे
कळी हासता हसशी
फुलातून तूच वसे

चंदनाची उटी अंगी
गळा वैजयंती  शोभे
कुठे आणखी शोधू रे
सुख तुझ्या पायी उभे

राधे राधे म्हणे कृष्ण
कृष्णा पायी मी दंगले
ऐक मोहना माझे रे
चित्त चरणी रंगले
तुझ्या चरणी रंगले

दि.०९/१०/२०२३
रात्री ०८.५६ वा.




## (४५)
## कृष्ण निळा मनभावी

निळेशार नभ अथांग सागर
निळी जळाची घागर
निळीच खोली निळी विशाली
निळे निळाईत आगर

निळ्या बिंदुतून निळ्या सिंधुची
निळी दिमाखी ऐट
निळ्याशार लाटांची निळवट
कुजबुज निळीच ऐक

निळ्या खोलीतून निळे विश्व मग
तळी निळी निळराई
जलचर प्राशन करती निळेपण
निळी सृष्टी निलवाई

निळ्याशार निल अनंत गगनी
पंख निळे निलपक्षी
निळ्या निळूल्या झेपा उंचच
उंच नभी निलनक्षी

नीलाक्षी निलयातुन लक्ष्मी
नील सुंदरी कोणी
निळ्या पापण्यातून उमटते
निळे स्वप्नं आतुनी

अशी निळाई गर्द निळूली
अथवा फिकी निळशाई
राधा निलकांतीने सजते
कृष्ण निळा मनभावी

दि.०७/११/२०२३
सायं ०६.३२ वा.




## (४६)
## मीरा तुझ्या भक्तीसाठी

मीरा तुझ्या भक्तीसाठी
श्याम विष प्याला
प्याला जरी विषाचा
तो अमृतची झाला

श्वास तुझा हरी असे
अन्य काही तुला न दिसे
जगरीत  विसरुनी सारी
श्यामरूप तू होत असे

मिटशी नयना तो श्याम दिसे
यातना नच, तुज श्याम भासे
सुखक्षण दिसले की श्याम वाटतो
कृष्ण मला सांग कुठे न भेटतो

जीव गुंतला असीम भक्तीत
मीरेच्या श्रद्धेच्या शक्तीत
इतकी एकरूप कशी गं झालीस
श्याम सख्याला सामावून गेलीस

अशी भक्त मी कधी न पाहिली
शुद्ध हरपुनी जीवकळीच वाहिली
संसारातून फिरते तुझे ते
नुसतेच शरीर बघ भावविरहीत

वर वर पाहता मीरा गुंगली
ती तर हरिगुणगायनी रंगली
जीवन म्हणजे श्यामच तिजला
विष द्या अथवा अमृत प्याला

भजन तिचे मग शब्दधुंद ते
भक्ति रसाने होत चिंब ते
श्याम वाहतो भजनामधुनी
श्याम ऐकू ये गायनामधुनी

श्याम दिशा, श्यामच आशा
श्याम प्रतीक्षा, श्याम मनीषा
जगणे श्याम, मरणे श्याम
श्वासावरती कोरणे श्याम

काही न ठाऊक त्याविन तुजला
अशी मीरा तू कळली मजला
भक्ती कशी बघ दिसेल शरीरी
मीरा जैसी असेल गहिरी

दि.५/८/१९
दुपारी ४.५७ वा.



## (४७)
## घे ना राधिके

घे ना राधिके कोमल हाती
प्रिय ही माझी वेणू बासुरी
देह हिचा वेताचा जरीही
सूर सजीव ही छेडत राही

श्वास देतो मी हिच्यात भरुनी
जगण्यातून  ही सूर पेरता
सप्तसुरांनी छेडून तारा
गात राहते राधा राधा

मी हिला विचारी, असे कसे गं
मी तर सारे सा रे गातो
निज प्राणांनी तुला फुंकता
सूर राधेचा कसा हा येतो

सांगे मंजुनादे ही बासुरी
देवा आधाराची मी भुकेली
तू तर अधरी स्थान देऊनी
निज श्वासांनी भरली ही कुडी

मजवर केले श्वास उधार
कसे फेडू मी हे उपकार
हृदयातून येतील जे देवा
तुझे प्रेमसुर अंतर्याम

त्या सुरांना मीच जाणते
राधा राधा कोरून येते
आत घेशी तू देवा तिजला
निःश्वासातही तीच वाहते

जरी ओठी मी बिलगून राही
आठही प्रहरी राधा पाही
जळी स्थळी तुज दिसे राधिका
देवा तव हृदया मी पाही

देह तुझा जरी माझ्याजवळी
चित्ती तीच बघ क्षणाक्षणाला
कधी वाटते राधा बासुरी
बिलगून मजला जाणीशी तिला

राधा होणे मज ना नशिबी
तरी तुझे ते प्रेम मिळाले
राधेसाठी तू मजजवळी
एवढेच मज भाग्य लाभले

एकदा हरी ऐक माझेही
लाव बासुरी राधेअधरी
सांगीन तिजला प्रेम तुझे ते
क्षणाक्षणाला अधीर कितीतरी

तिला सांगणे तीच हरीमनी
सूर असू दे अथवा गाणी
राधा राधा गातो श्रीहरी
अंतर्मनीही राधाराणी

तोऽऽ एकटा कधीच नसतो
असशी संगे तूच राधिके
मी तर केवळ साधन होऊन
गीत तुझेच ते छेडीत जाते

अलौकिक हे प्रेम विराळे
कधी न पाहिले असे निराळे
देह वेगळा वाटे तरीही
राधा श्यामच श्याम राधळे

तुझ्यासारखे येवो समर्पण
मजला तव सेवाही लाभू दे
राधे ऐसा वर तू द्यावा
दोघांमधले सूर मी होऊ दे

सूर सुराला भिडू दे ऐसा
राधाश्याम ही दुनिया व्हावी
सायंकाळी यमुनेमध्ये
प्रीततरंगी होडी वहावी

आज जी हसली राधा गाली
बासुरीस ती चुंबून गेली
हरीच्या प्रेमासाठी काष्ठ ही
चंदन होऊन गंधून गेली

दि.१७/०५/२०२०
दुपारी ३.११ वा.



## (४८)
## कृष्ण दामोदर

रे कृष्ण दामोदर
ये ना तू अवनीवर
राधा म्हणून मजला
घे तूझ्या बासरीवर

ते प्रेम देहातीत
ते मीलन अतीत
कोणी न मजसी दुजा
जन्मोजन्मी प्रतीत

कोणा न कळे सहजी
ती आपुली रे प्रीत
कोणास वाटे देह
होतात दोन एक
कोणी करे विचार
मन दोन जुळले आपुले
पण याही पलीकडचे
ते प्रेम दिव्य आपुले

आतून भेट होते
ते आत्म मीलन की
देहास इथे सीमा
मी कृष्णमय वेडी

तूही उगाऽऽऽच माझा
लेऊन रंग राधा
तो कृष्ण नाकळे ना
कोणास का रे साधा

माझ्या कणाकणावर
तू प्रेम पेरलेले
माझ्या क्षणाक्षणावर
मोहन कोरलेले

मज आजही दिसावा
ब्राह्मांडी तूच राजस
आले पुन्हा मी येथे
ते तेज मिळविण्यास

पाहून वाट शिणले
साथी न साथ देई
तू माझ्या प्रेमासाठी
येई ना झणी येई

तेंव्हाही राधा होती
लौकिक विवाहित
होती परंतु केवळ
ती तुजवरीच मोहित

तो सोहळा विवाही
अद्यापि चालतो रे
तुलसीविवाहसमयी
आपुला विवाह हो रे

मी तळमळे रे श्याम
ये ना जवळ घे ना
ते कुंजवनी होते
तैसेंच प्रेम दे ना

ना अर्थ तूजवीण
नात्यास येथल्या या
मी अर्पिले स्वतःला
माझ्याच सावळ्याला

पाहू नकोस अंत
मुरलीधरा अनंता
राधा अधुरी आहे
तुजवीण भगवंता

अश्रूंची वाहे सरिता
श्वासास तूच आस
नाही रे मनी काही
केवळ तुझाच ध्यास

देहात प्रकटुनी ये
देहातुनी दे मुक्ती
घेऊन तूजजवळी
राधेची चाख भक्ती

ही प्रीत काही भिन्न
हे तत्त्व वेगळेच
मी तू रे राधेश्याम
अनुराग आगळेच

मी युक्त तुजसवेच
युगयूगे उलटावी
राधेस भेटण्याची
ही कृष्ण ओढ व्हावी

देऊ नकोस जन्म
राधेस नवा पुन्हा
तू येणे मग अटळ रे
राधेचा होत कान्हा

दि.१०/०२/२१
सकाळी १०.१५ वा.




## (४९)
## सांग राधे काय देऊ

सांग राधे काय देऊ
मी तुला सखी गं
श्याम पुसतो गूज अवचित
बोल मजसी गं

प्रासाद तुजला देऊ का
बांधून सुंदर रम्यसा
सारी सुखे हसतील तेथे
चरणी तुझिया राहता

का सखे मी भूषणे
देऊ तुला कोरीव गं
रत्न जडले, स्वर्ण घडले
आभूषणे ती भरीव गं

सांग राधे तव पदी
ऐश्वर्य आणीन स्वर्गीचे
जे जे हवे ते तुजसी मी
देईन बघ इहलोकींचे

आकांक्षा काही बोल ना
मनीषा तुझ्या तू सांग ना
संकोच नसू दे तव मनी
काहीतरी तू माग ना

वस्त्रे ऐसी दिव्य देईन
तलमता स्पर्शात गं
रूप निरखून घेशी तू
पुनः पुन्हा आरशात गं

अजूनही अबोल तू
पाहसी मजला अशी
सेवा तुझी करू दे मला
तू करीशी नित माझी जशी

ऐक सखया, चित्तचोरा
कामना ना ऊरल्या
तू दिल्या आधीच मजला
ओंजळी सुखं भरल्या

वेळ मजला दे सदैव
पाहू दे तुज सारखे
सहवासी सुख मजला
होऊ ना दे पारखे

नेत्री वसू दे तूच कृष्णा
चित्ती तू राहो सदा
तू मनाने होशी माझा
हीच माझी संपदा

वस्त्रं, भूषण, प्रासादांचं
सांग मजला काय ना
तू जवळी मज असशी तर
सारे उपाय ही तूच ना

राधेला घे सामावुन तू
राधाश्याम हो एक ना
वाहिला मी जीव तुजला
श्याम होऊ दे मला

दि३०/७/१९
सकाळी ७.२६ वा.




## (५०)
## राधे, आज कुंजवनी

राधे, आज कुंजवनी
झुलू चल झुला
फुलाफुलांनी गं त्याला
बघ सजविला

कोमल ती काया तुझी
भूवरीची माया
प्रकृती नि पुरुषाची
अंतराळी छाया

वासंतिक पुष्पांची
आरास सजवली
खांद्यावरी अलगद
तू मान झुकवली

आज कृष्ण झुकला गं
राधेसाठी माझ्या
एकरूप चित्त एक
मनी राहतो मी तुझ्या

मुद्रा तुझी माझी अशी
युगायुगातून
राधा राधा जप चाले
श्याम श्वासातून

काय नाते आपुले
कसे सांगावे कुणाला
शुद्ध प्रेम असता
विचारावे गं मनाला

तू शरीरधारी प्रेम
मी प्रेमधारी श्रीहरी
प्रेमगीत गाऊनी
साथी होय बासुरी

उंच जाऊ दे झुला
पाहिलेस तू मला
झोकुनिया माझ्यावरी
जीव तुझा वाहिला

श्याम देई वचन तुला
विवाहाचा क्षण आला
वृंदा होऊनिया राधा
दामोदर भेटण्याला

दि. १०/८/१९
दुपारी २.२३ वा.



## (५१)
## काळा सावळा हा श्याम

काळा सावळा हा श्याम
नभातुन दाटलेला
वाजवीत जलधारा
हाती तोच पावा घ्यावा

मन होत गोपगोपी
त्याचा स्नेह की झेलावा
राधा अंतरात्मा होई
श्याम राधेत विरावा

झरताना आभाळाने
मज चिंब ओलवावे
असा पाऊस येताना
गीत ओठात झुलावे

दि.१७/०७/२०२०
दुपारी ०१.३५ वा.



## (५२)
## कृष्ण कोण? चित्त माझे

कृष्ण कोण? चित्त माझे
कृष्ण अंतरंग
कृष्ण कोण ध्येय माझे
जीवन तरंग

अवतरला बाळरूपे
मोहक ते रूप रे
पूर्णपुरुष अवतारी
धर्म हे स्वरूप रे
कृष्ण कोण गीता
उपदेश सार सारे हे
कृष्ण कोण सारथ्य
देहरथ रथी रे

दुष्टनिर्दालनी
लीला साऱ्या खेळल्या
प्रेम अलौकिक कसे
रासकेली गोपिका
कृष्ण कोण राधिका
कृष्ण रुख्मिनीवरा
कृष्ण होतो प्रियसखा
कृष्ण मीरा भक्तीचा

कृष्ण सत्य कृष्ण नित्य
कृष्ण परमधाम गे
कृष्ण ध्यान, कृष्ण ज्ञान
कृष्ण मोक्षनाम हे
कृष्ण कोण तनमन मम
कृष्ण प्रेमरंग हे
कृष्ण श्वासबासुरी
कृष्ण मधुर गीत हे

दि.११/०८/२०२०
सकाळी०७.२२ वा.



## (५३)
## श्याम तुला शोधू कुठे

श्याम तुला शोधू कुठे
नभ रंग तू
पाहू कसे कुठे सांग
अंतरंग तू

हो प्रकाश निळा निळा
निळी सखोली
निळ्या अशा सावळ्या
हरीची बाधा झाली

घरी तोच दारी तोच
अंगणीही तोच
दूर कुठे जावे तरी
मनी वनी तोच

दिसे उघड्या दृष्टीला
म्हणून मिटून घेते
लोचनांच्या आतूनही
रूप तेच दिसते

व्यापला कणाकणात
काय जादू केली
रासरंगी गोपिकांची
एकात्म मने झाली

आजंही दिसे तो मला
पानापानातून
झाडीतल्या वाकलेल्या
कवडशातून

एक कवडसा आत
आलेला असे हा
बाहेर ना शोधू आता
आतची वसे हा

दि.०४/०३/२१
०८.३१ वा.




## (५४)
## हरी पदकमलासी

हरी पदकमलासी
राधेच्या पदा
राधाकृष्णचरणांशी
सर्व संपदा

रासक्रीडेमध्ये गिरकी
घेतली त्यांनी
एकरूप दोघे
मन आत्मभावानी

मने चालती सोबत
सोबत पदे
रंग सावळा नि गोरा
पदानुपदे

म्हणे कृष्ण सांग राधे
किती तू गोरी
सर्वांगी मी सावळा गं
काळाच हरी

नको अशी खंत करू
मनी काहीतरी धरू
जोडू पदालागी पदं
मग निर्णयासी करू

क्रीडेमध्ये जोडीयले
एकएका पदा
झणी अशा दर्शनाने
विलयी विपदा

गाली हसे कृष्णराया
झालो कसा गोरा
राधेलाही तिचा पाय
दिसे की सावळा

तुम्हा आम्हा दिसे
असे रूप हे वेगळे
द्वैत मनी असे त्यांना
चरण आगळे

जिथे झाली आत्म
परमात्म संगतीच
राधाकृष्ण चरणाशी
नित्य सद्गतीच

दि.०५/०४/२१
सायं ०६.५८ वा.




## (५५)
## रूप राधेचं

रूप राधेचं नाजूक कवळं
मोहनाचं गं रूपडं सावळं
गंध हुंगतो गुंगतो श्याम
राधा केसात गुंततो श्याम

राधा हरखली, राधा हरपली
चित्त हरवून गेली वेडी
मन रमेना काही सुचेना
तिला कृष्णाची केवळ गोडी

हाती कमळ घेऊन बसली
मनी हळूच खुदकन हसली
हात टेकविला गोऱ्या गाली
एक पसरली मुखी लाली

डोळे मिटले तरी हा दिसे श्रीहरी
त्याचेच चिंतन साऱ्या प्रहरी
अवती भोवती त्याचाच वास
आत बाहेरी त्याचाच भास

मोकळ्या केसात श्याम राहतो
चांदण्यातून तो मला पाहतो
आभूषणे सारी फिकी त्यापुढे
श्यामच माझा भूषण खरे

तो माझा मी त्याची युगानुयुगे
प्रीतसरिता वेगळी वाहे
रीत वेगळी वेगरी धारा
राधा मिळाली कृष्णसागरा

दि.०३/०४/२१
रात्री १०.१४ वा.



## (५६)
## चांदणशर्वरी

चांदणशर्वरी
शीतकिरणे भूवरी
रम्य सरसतीरी
राधेसंग गिरीधारी

स्वच्छ शुभ्र नभांगण
आलं भराला चांदणं
नीलरंगी आकाशानं
राधारंग पांघरणं

सरोवर ते प्रसन्न
कुमुदिनी मोदमन
चंद्र पाही नभातून
तुझं माझं रे भेटणं

आली श्वेतहंस जोडी
जीवा शिवाची सांगडी
तुझ्यासवे मज गोडी
निरखती वेळा अजोडी

आज आपण वेगळे
असू जरी नेहमीचे
मांडीवर करा टेकू
तुझ्या पुढे राधा बसे

तुही हळुवार माझ्या
केशकुंतली रमला
सोनफुला माळताना
आरसाही ओशाळला

पाहण्यास दर्पणात
छवी गुंग तुझी माझी
मला दिसेनाच मी की
दिसे सावळा श्रीहरी

रूप तुझे निरखते
मजला मी विसरते
प्रेम असे हे कसे रे
जगताला मोहवते

विश्वाचा पोषक तू
राधा क्षुल्लक जीवजन्तु
कसे प्राण गुंतले रे
तुझे माझ्या हृदयातु

राधा राधेची कधी ना
प्रेमभक्ती ही तुझी ना
अंतरीच्या दर्पणात
राधाश्याम एक हो ना

दि.२६/७/१९
सकाळी ८.१५ वा




## (५७)
## राधे तुझ्या प्रेमासाठी

राधे तुझ्या प्रेमासाठी
श्याम रास रंगतो
ऐक सखे आज तुला
गुज मनी सांगतो

प्रेम तुझे आत्मरूप
पाहता तुला स्वरूप
नयनी तुझ्या देखतो
श्याम राधा भासतो

बंधन कसले या देहाचे
प्रेम राधे गं तुझे हे ऐसे
देहातीत ही राधा होते
पवित्र प्रेमा लेऊन येते

अष्टभाव जागृतीस आणूनि
अबोल तरी तू राधाराणी
लौकिक देहिक रीत प्रेमाची
कधीच नसते आपुल्या मनी

नेत्रदर्पणी तुझ्या गं वेडे
श्यामछटा या भरून जाती
श्वासांमधल्या लयीस पाहून
श्यामजपाचे ध्वनी ही येती

हळूच उतरतो अंतरात तव
राधा कोठे, कोठे तू तर
शोधून शोधून थकलो मी गं
श्यामंच श्याम तुझ्या मनावर

तुला पाहण्या समजून घेण्या
श्याम उतावीळ सायंकाळी
सूर वेणूचे पसरून जाती
तुझ्याजवळ ते तिन्ही त्रिकाळी

सांग सखे मज चैनच नाही
राधा मजला पाहू दे खरी
राधा राधा करीशी वेड्या
राधा आता उरली नाही

राधा झाली श्याम अशी की
तिलाही ती रे कळली नाही
कळतो राधेला श्यामगोडवा
अनन्या तिजसम घडली नाही

म्हणून देवा जीव गुंतला
राधेपायी तुझा चांगला
प्रतीक राधा केवळ होते
प्रेम हरीचे सफळ इथले

दि.१८/७/१९
सकाळी ७.२६ वा



## (५८)
## एकतान राधा जीव

एकतान राधा जीव
हरी राधा होई आज
डोळे मिटता लौकिक
प्रेम अलौकिक साज

मोरपंखी तोच राहे
प्राणातून तोच वाहे
लोचनात तोच पाहे
राधादेही तोच आहे

देह वेगळे वाटती
मने प्रेमाने दाटती
भेद नुरे येथे काही
प्राण पायी वाहताती

राधा वस्त्र नीलकांती
श्याम सावळ्याची भ्रांती
तीच चंद्रकौमुदी ना
हरी तत्त्व ते वेदांती

तिचे मन तोच होतो
त्याचे मन तिच्यापाशी
प्रेमधारा ती वाहते
हरी त्यासाठी उपाशी

दि.०९/०६/२०२०
दुपारी १२.२९ वा.



## (५९)
## श्याम डवरून आला

श्याम डवरून आला
धरणीच्या कुशीतून
त्याच्या हसण्याची फुले
निळ्या रंगात न्हाऊन

हिरव्या शालूवर थोडा
यशोदेच्या पहुडतो
देवकीच्या आठवात
माया रंगीही रंगतो

त्याच्या रंगाच्या प्रेमात
नभ क्षितीजही निळे
हिरव्या फुलझाडातून
रूप निळे नि सावळे

रंग किती ते फुलांचे
साऱ्या गोपिका ठराव्या
रंगनाथ का म्हणती
श्यामसुंदर सावळ्या

दूरवर झाडी पहा
रंग सोडून रंगली
निळ्या श्यामल रंगात
अतरंगी की दंगली

फुलबागा जीवसृष्टी
पालक हा मोहन की
जे रंगती त्याच्या रंगी
भक्त सावळेच होती

राधा कळी पाकळीत
तिचा रंग गे कोणता
हरी तिच्यात सामावे
एकरंग हा जाणता

आत्मरंगाची ही होळी
आत्मानंद पिचकारी
रंग उडवू उधाण
जीव श्वासाची बासरी

सूर येतील रंगून
तोच हरी नि मुरारी
उमटते आसमंती
छबी मनाच्या गाभारी

दि.०९/०६/२०२०
रात्री १०.३० वा.



**(६०)**

## कोणी लावीयले दीप

कोणी लावीयले दीप
रान दिवाळी चालली
नीलकांती ज्योती साऱ्या
कृष्णप्रभा की फाकली

तरुतळी या गोजिऱ्या
साऱ्या गोपिका जमल्या
रंग विसरून एका
हरीरंगात नाहल्या

कुणी साजरी ही केली
रंग होळी की सावळी
हिरव्या चैतन्याचा रंग
वर हरीची निळाई

आला आला रानी देव
सूर वेणूचे घुमती
त्याची गीतफुले सारी
ताल धरून नाचती

हरी भव्यदिव्य तरु
त्याच्या चरणाशी राहू
भक्तीफुलें चित्ताठायी
रूप विराट ते पाहू
रूप विराट ते पाहू

दि.१७/०८/२०२०
सकाळी ०८.२७ वा.



## (६१)
## आज सांज म्हणे वेडी

आज सांज म्हणे वेडी
गोड थंडीत बुडाली
थंडी गुलाबी की बंडी
तिने अंगी पांघरली

बंडखोर थोडी थोडी
अवखळ वेडी लाडी
वेड तिज ऐसे लागे
लागे ऋतूची या गोडी

गोडीगुलाबीने ऐशी
गुलाबात हास
हसली की राधा
श्याम गुलाबीच रास

रास रंगांची उधळे
संध्याराणी गगनात
गगन मगन त्यात होई
रंग त्याच्याही मनात

मनी असती जे रंग
आत खोल दडलेले
दडूनिया प्रेम सारे
सारे आत वाढलेले

रंग पसरला आता
मला सांगणे की सोपे
प्रियेदारी निशिगंध
मन गुलाबाच्या संगे

रात्र तरुणी सुंदरी
जरा सजुनिया आली
वाट पाहण्या आधीच
माझी वाट गंधाळली

रंग असेच राहू दे
थोडे वेडे ते अल्लड
आज स्वर्गीचा वसंत
इथे मला ना उसंत

मन चिंब गुलाबाने
आत रुधिर गुलाबी
प्रिया गुलाबी नि तिची
रिझवणंही गुलाबी

दि.०४/१२/२०२०
रात्री ०९.०१ वा.




## (६२)
## राधा कोठे

सगळ्यांशी जुडलो आहे जरी मी
तरी बुडलो केवळ तुझ्यामध्ये
मी न राहिलो माझा वेडे
सामावलो मी तुझ्यामध्ये

तुझे हासणे, तुझे बोलणे
अवखळ सारे तुझे वागणे
प्रेमामध्ये सरितेसम तव
झोकून देऊन असे वाहणे

तुझेच सारे शब्द बोलती
भवताली या आसमंती मज
गीत तुझेच हे ऐकू येते
क्षणोक्षणी आतून कुठून मज

नयनांमध्ये कोंडून घेतो
आनंदाने तुझ्या रोज मी
जगतासंगे भांडून घेतो
स्वानंदाने तुझ्यासाठी मी

अशी वेगळी वीण नात्याची
आयुष्याने विणली आहे
राधा कोठे कोठे बाहेर
कृष्णामध्ये भिणली आहे

दि.२४/११/2020
०८.५३ वा.



## (६३)
## निळ्या आभाळाची माया

निळ्या आभाळाची माया
नदी खळखळ वाहे
चैतन्याची एक लाट
अंगी सळसळताहे

सर्ग निसर्ग विसर्ग
देत जाणे व्रत एक
हिरव्या झाडीतली छाया
मना विरंगुळा नेक

डोंगरांनी पांघरला
रंग विशाल नभाचा
गगनात छटा आल्या
पिंजलेल्या कापसाच्या

हिरवी हिरवाई साडी
निळीशार झालरही
मध्ये वर्ण श्वेत वाहे
नदी शृंगारली काही

कशी लाजली लाजली
मान मुरडून गेली
वळणावळणाला वळली
नागमोडी चाललेली

आज सरिता न रिती
प्रेम चिंब भिजलेली
उसळत्या लाटांतून
प्रीत गीत गायलेली

असा सुखद सुखद
पट रंगवीत गेला
कोण चित्रकार तिथे
कल्पनेत रंगलेला

कित्ती रंग त्याच्यापाशी
अशा छटांची संगती
हरी मोहतो श्रीहरी
रंग होत मोरपिशी

दि.२३/०३/२१
रात्री १०.११ वा.




## (६४)
## रंग गुलाबी सजला

रंग गुलाबी सजला
गोजिऱ्या गोड फुला
नाव गुलाब मिळाले
रंग ओळखची झाला

रंग जीवापाड प्रेम
रंग मदनाचा नेम
रंग लाज गालावरची
रंग तालीम प्रेमाची

गुलाब अधरांची
गुलाबी थरथर
गुलाब कांती येते
तरुण झाली नार

गुलाब हाती दिसता
माय बापाला की घोर
रंग उडे चेहऱ्याचा
अस्पृष्ट राहो पोर

स्वप्न गुलाबी दिसता
पोरं हुंदडती फार
दिस रातीमध्ये लीन
रात होते दिस भर

एक गुलाबी रंगाचा
कवी जागा होतो तेंव्हा
जग सारे विसरून
नवे जग ये आकारा

गुलाबी पंखामध्ये
बळ गुलाबी रंगाचे
निळे आकाश ना राही
गुलाब बन त्यांचे

रंग डोळ्यात दिसतो
मनाच्या दर्पणाने
रंग गुलाबी सार्थक
होई जन्म अर्पणाने

रंग राधेचा गुलाबी
श्याम सोडतो निळाई
राधा शाम रूप ल्येते
श्याम राधा रंग घेई

गुलाब श्याम होई
राधा मोहरून जाई

दि. २/७/१९
रात्री ९.११ वा




## (६५)
## अदृश्य प्रियधागे

अदृश्य अशा प्रियधाग्यांनी
घट्ट बांधिले कुणी
ना सोबतीला असते ती
पण मुक्त राहिलो ना मी

ते धागे ना साधेसुधे जे
रेशमी असूनी टिकणारे
दिसतील ना कधी जगताला पण
मनात लखलख लखणारे

ती राधा मी मोहन होऊन
युगायुगातून जगतो ना
अलौकिक प्रेमाचे आम्ही
दृष्टांत मधुर ते होतो ना

या धाग्यांची साक्ष देतसे
नयनामधली प्रीत सदा
या प्रेमाला भाव पुरेसा
हृदयांतरी जो बहरू आला

धागे लौकिक प्रीत अलौकिक
पवित्रतेची वृंदा जी
दामोदर मी होऊन करतो
मनाचा मनाशी परिणय की

दि.१९/१२/१९
सायं५.२३ वा.



## (६६)
## सख्या आठवण तुझी

सख्या आठवण तुझी
जगण्याची रीत माझी
कशी विसरेन तुला
देही माझ्या तू वाहशी

कळता वा न कळता
शांत असता बोलता
माझ्या मनात रे तुच
सदा रुंजी ती घालता

याला प्रेम म्हणावे की
भक्ती प्रेमाची म्हणावी
कृष्ण झाल्याविना बरे
राधा कशी ती जाणावी

शब्द अर्थ वाहताती
अर्थ तूच माझा होशी
निराकार की साकारी
देही अथवा अंतरी

तुज वाहते हा जीव
जीव कसला हा भाव
तुजसाठी झुरणे हा
माझा गडद स्वभाव

श्वास घेता घेता तूच
माझ्या हृदयी वसशी
नेत्र मिटुनी मी घेता
तूच तेथेही दिसशी

दर्पणी मला पाहू
जरा थांबते रुळते
तेथेही माझ्या भवती
तुझे खट्याळ चाळे ते

तू कुठे, कुठे बाहेरी
कसे सांगू तू अंतरी
अनुरेणूतुन तूच
माझ्या जन्मजन्मांतरी

दि.१७/१०/१९
सायं ७.५३ वा.



## (६७)
## नभ कृष्णाई

हे डोंगर की पाचूचे सुंदर
लेणे हिरवे हिरवेगार
खंडर होते इथे एकदा
कुणी कधी सांगू शकणार

कातळ उंच खडक पोसले
दरीदरीतून निराश बसले
उदास साऱ्या परिसराला
वर्षावाचे स्वप्न दिसले

डोंगर स्वप्नी भिजून गेला
कडे कपाऱ्या चिंब जाहल्या
दऱ्या दऱ्यातून स्रोत वाहिले
क्षणात खळखळ नद्या वाहल्या

हिरवे डोंगर सजली धरती
आकाशाची निळाई वरती
हरित दर्पणी रूप पाहता
डोंगर हिरवा निळ्याला भरती

हिरव्या हिरव्यागार मल्मली
शेल्याने डोंगरे झाकली
शृंगाराला उधाण आले
आभाळाने कात टाकली

धुक्यात वेड्या फिके जाहले
ऊन जरासे दबकत आले
डोंगर हिरवे मुकुट घालुनी
मोरपिसांनी सजून गेले

सजून धजून निळा श्याम होऊनी
स्वर्गाचे सूर ओठी घेऊनी
नभ कृष्णाई झुकता खाली
डोंगरराधा बहरुनी आली

दि.१३/७/१९
सकाळी ९.४७ वा.




## (६८)
## जगावेगळी निळाई

अशी कशी ही किमया घडते
जगावेगळी निळाई चढते
तुझयाच पायी येण्यासाठी
फूल वेगळे इथे जन्मते

क्वचित देखले फूलताटवे
रंग विराळे असे निराळे
कधी वाटते खरे नं हे
निळे कुंचले रोमही निळे

झाडालाही पडले कोडे
अवचित ऐसे कैसे घडले
लाल, गुलाबी, पिवळे, केशरी
सोडून रंगा निळाई पांघरे

उद्यानातून फिरता फिरता
हात तुझा हळुवार फिरला
तव स्पर्शाची ताकद देवा
नीलरंग बघ तुझा घेतला

असे वेगळे फूल उमलले
वाऱ्यानेही संगी नेले
फूल अनवट डुले निराळे
श्रीरंगाने आपुले केले

दि. १८/७/१९
सकाळी ७.४७ वा.



## (६९)
## मोरपिसे

नाचतोच ना एकदा तरी मोर
प्रत्येकाच्या मनात अथवा
समोरच्याच्या मनात
होऊन चित्तचोर

कितीतरी पिसे अशीच गळतात
नकळत पाऊस येतो
एक मोरपीस हळूच कोणाच्या
गालावरून मलमल स्पर्शी फिरून जातं
आयुष्याचं गाणं सप्तरंगी
होऊन जातं

कुणा मुकुटी मोरपिसांच्या
रंगत जाती छटा अनोख्या
कधी कुणाच्या हृदयस्थळावर
ओसाड ऐशा भावस्थळीवर
एकाएकी धार बरसते
मेघ गर्जती वीज चमकते

एक नव्हे हो अनेक येती
दिलखुलास नाचण्यास मोर
मोर नाचता कधी कुणाच्या
भाग्यभूमीवर दैव बरसते

श्रीरंगाच्या मुकुटातुनी मग
सौभाग्याची पिसे डोलती
एक मोरपीस कृष्ण मुकुटी
एक राधेच्या चित्तकपाटी

एक आत्म्याच्या कधी न
उघडल्या ऐशा दुर्मिळ पेटी
एक संचित होऊन येते
जन्मोजन्मी माझ्या गाठी

एक भूतकाळ होऊन पाठी
एक भविष्याची रांगोळी गोरटी
एक डोळ्यातून सतत
झळकले प्रिया होऊन गोमटी

मोरपिसे ही ऋणानुबंध
हळुवार अशी सांगती

दि .२१/७/१९
दुपारी २.५७ वा



## (७०)
## रंगांचा कुंचला हरीचा

गर्द निळ्या जांभळ्या फुलांची
रंगीत दुलई पांघरावी
वर्णहीन डोंगरानं देखील
हिरवी चटई अंथरावी

निळी जांभळी फुले केवढी
उत्सुक दिसती डुलण्याला
रानफुलांचा वर्णोत्सव हा
जरूर या हो पाहण्याला

आपुल्याच नादात फुले ही
नंदकुमारा आळवती
राधेच्या गालाची निळाई
अंगाला माखून घेती

घरादाराशी उमलणारी
गोकर्णाची फुले जांभळी
गोपालाच्या आठवणीत
तीही दाटसर घेती  निळाई

गाईच्या कानाचा घेऊन
हुबेहूब शरीरा आकार
शिवशंभुला प्रिय होऊनी
गोकर्ण मानते जणू आभार

निसर्गास ना कधी वावडे
कोणत्याही त्या रंगाचे
फुलास तर फुलणेच आवडे
रंग ल्येत श्रीरंगाचे

हिरव्या पानांवरती दिसती
निळी जांभळी फुले डोलती
रंगांचा कुंचला हरीचा
फिरता रंगही बोलू लागती

दि.२२/७/१९
सायं ६.४६ वा.




## (७१)
## राधा ही सुमनवेशा

बाग जांभळी गुलाबी
आकाश हे शराबी
निळ्याशार रंगातुनी
रंग पाझरे गुलाबी

गुलबक्षी गडद रंगा
फिक्या गुलाबी पाकळ्या
मिसळुनी रंग जाता
मोहात नभही पडता

पक्ष्यास झेप घेणे
वाटे किती सुहाने
पंखास पसरूनिया
रंगास भेट देणे

नीलवर्ण नीलाक्षी
अंबरास साजेशी
धरती गुलाबी वेडी
गुलकांती घेत वक्षी

रंग रंग नसती केवळ
ते भावनांची भाषा
नीलवर्ण मेघकृष्ण
राधा ही सुमनवेशा

दि.२८/७/१९
रात्री ८.१७ वा.



## (७२)
## क्षितिजावरची लालिमा

क्षितिजावरची लालिमा
सरोवरात बिंबिली
आकाशाने पहाटेला
हळूच धरणी चुंबिली

लाजली ती लाजली
क्षितिजापाशी थांबली
लाल लालेलाल गाल
पाण्यात लपवू लागली

धुऊन घेता जळामध्ये
कपोललाली उतरली
धरा अजूनच क्षितीजाच्या
कुशीत लपून बावरली

त्यातच बिंब नारायणाचे
प्राचीवरती अवतरले
निद्रेत गुंगल्या विश्वाला
प्रेम तयांचे हे कळले

अशा लाघवी प्रणयवेळा
रोज सकाळी धरणीला
निशा कुशीतून उठवत येतो
आभाळसखा बघ तरुणीला

ती बघते, उठते आपुलकीने
त्याचे स्वागत करण्याला
सृष्टी रंगते त्या दोघांच्या
रम्य गोमट्या मेलनाला

जाग जागला शुभ्र पतंग
शोधत हंसी राजहंस
तिच्या मीलना उत्सुक तो की
अशा वेळेला असीम दिगंत

झाडे जागली, पानोपानी
उत्फुल्ल तयांचे दिसती रंग
प्रतिबिंबाने दोन वाटती
सृष्टीराधा नभश्रीरंग

दि.२८/७/१९
दुपारी ३.२१ वा.



## (७३)
## कदंबपुष्पे

कदंब वृक्ष हे असती पुरातन
फुले गेंद गोल गोल
पिवळसर पांढुरक्या छटांची
फुले ठरती अनमोल

ग्राम्य नाव याचे 'निवं'असते
फूल हेच फळही ठरते
गोल गोल कंदुकी सृष्टी बघ
मंद गंध ओतप्रोत भरते

गरगरीत गोलाकार फुले
त्यात असंख्य दिसती पाकळ्या
केंद्रातून त्या बाहेर डोकवीत
अगणित भासती मृदुकळ्या

संस्कृत साहित्यातून याची
जडली नाळ सौंदर्याशी
स्वरूप सुंदरी रमणी कोणी
मदिराचूळ भरी याच्या तळाशी

तदनंतर हा वृक्ष बहरतो
वाट पाहतो रमणीची
ती रमणी लावण्यवतीही
रूपछबी ऋतुराणीची

ती नसली तर कदंब रुसतो
गाल फुगवूनी तसाच बसतो
वसंत येतो तरी ना उमलतो
प्रियकरांना उगाच छळतो

मदिराक्षीच्या धुंद चुळांनी
पानोपानी फुले डोकवती
कदंब फुलला, कदंब फुलला
रानीवनी उत्सव भरती

कात्यायनी व्रत प्रसंग यमुनी
स्नानास उतरल्या गोपी
कदंबवृक्षावरी तयांची
वस्त्रे हरीने लपविली

राधेसंगे रमला सदैव
कदंबवनी नित श्रीरंग
खेळ खेळला अगम्य प्रेमिक
दंग दंगला मोहून कदंब

कृष्णगोपिका कदंब तरूशी
फेर धरुनी या नाचत गाती
वृंदावनी मग रास रंगते
कदंबपुष्पे गोपी होती

कृष्णतरुशी लगडून जाती
कृष्णतरुशी लगडून जाती

दि.२९/७/१९
सकाळी ९.१७ वा.



## (७४)
## मूर्त तुझी

मूर्त तुझी कृष्णराया
मनमोहक मनमोहना
मुरली तुझी सूर देई
भक्तीरस बोल भजना

पद वळवीशी लीलया तू
ओठी बासुरी विसावे
रूप तुझे संगीतात
रंगुनी मधूर व्हावे

कमलनयन मिटुनी उभा
सूर आळवीत जरा
सृष्टी होय साजरी
रूप मदन गोजिरा

मानवीय अवतार
विष्णू जिष्णु सावळा
गोकुळात नांदला
जीवभाव कोवळा

असुर संहारण्या
बुद्धिमती प्रेरणा
स्नेह भक्ता दाखवी
भक्ती हीच धारणा

कार्य किती साधले
दुःख तूही भोगले
जन्मदाते असून परी
प्रेम झाले पारखे
नाते विश्वनाथा रे
रक्ताचे कशास ते
लावीशी लळा असा
नाम गे दिशास ते

कर्म गीता गायिली
पार्थ शिष्य दास जो
समरी देव सारथी
जीवनाची आस जो

मूर्त तुझी देखणी
अष्टभाव उन्मळे
कृष्णसख्या मन आमुचे
होत जाय देवळे

तू तिथे, तू जिथे,
तू कुठे राहसी
दृष्टी कृपाळू सदा
प्रेमभरे पाहसी

चरणी तुझ्या चित्तफुले
रोज भावे वाहतो
वर्षा तुझी बरसू दे रे
मुक्ती इथे मागतो

दि.२२/८/१९
सकाळी ११.४१ वा.



## (७५)
## मी कृष्ण सखा

पायी प्राजक्ताचा सडा
कोमल सुखांनी स्पर्शीने
सुख वेचावे वेचावे
हात गंधाळून जाणे

तुझे प्रेम माझ्यासाठी
फूल पारिजातकाचे
लोक तुडवतील गं
मला जपणे जपणे

तू हळुवार कित्ती
भाव तुझे अलगद
मन तुझे कोमलता
लाजशी मी भाळता

एक आशेचा किरण
तुझ्या अळुमाळू फुला
केशराचा रंग त्याचा
वाटे जीवालागी भला

तुझे फुलणे फुलणे
आसमंती सुरभी गं
माझ्या देहाला मनाला
गंध वेडाचे लावणे

तुझे ओघळणे फार
अलवार अलवार
वेणू वाजवीशी नित
अंतर्यामी भुईवर

तुझा गंध बेभानसा
स्वर्गीय सुखकोश
मी कृष्ण सखा तुझा
तूचि रुक्मिणीची आस

दि.१५/९/१९
सकाळी ८.११ वा



## (७६)
## निसर्ग मोहन

रंग सावळा
जरठ पानांचा
नवी पालवी
हरितकोवळी

कुठे लालसर
कुठे श्वेतसर
कुठे गुलाबी
पान शराबी

केशर अंगी
पोपट रंगी
अबोली डोले
रंग खुमार

रंग रंगले
पर्ण कोवळे
रम्य सृष्टीचे
रंग सोहळे

झाड दामोदर
राधा पाने
नसानसातून
कृष्ण वाहणे

प्रत्येकीचा
रंग आगळा
राधा रंगीत
कृष्ण सावळा

रासरंगाचा
तो आधार
रंगे गोपिका
अपरंपार

खुले गोपिका
तशी राधिका
प्रत्येकीला
श्याम भेटतो

रंगून गेल्या
गुंगून गेल्या
श्रीरंगाच्या
मनी सावल्या

रासक्रीडेची
अशी मोहिनी
निसर्ग मोहन
राधा योगिनी

दि.२८/८/१९
सकाळी ११.४४ वा.




## (७७)
## राधेसंग कृष्ण रमे

राधेराणी झुला झुलू
असा हिंदोळा
सूर माझ्या वेणूचे गं
जीव हो गोळा

सजविला मोगरीने
संसार झुला
तुझ्या माझ्या प्रेमाची गं
जाण कुणाला

प्रीत अशी आगळी
वेगळी राणी
नाद मधुर गुंजती
कुंजवनी

सजविले देह रूप
धुंद सकाळी
आत्मरूप तेजसुर्य
उदयाचळी

कळतील का सांग कुणा
धागे वेगळे
राधेसंग कृष्ण रमे
नाते आगळे

दि.०४/०८/२१
सकाळी ०९.१३ वा.




## (७८)
## साद ऐसी असो

साद आली तुझी
हृदय प्रेमाळले
प्रीत उमलून ये
ऋतू पुन्हा भाळले

भावनांची असो
भावनांना कदर
डोळे हे वाचतील
भाव जाणे नजर

तू असा वागशील
उमलू येईन मी
तू ऋतु आणशील
कुसुम होइन मी

हळवे हळवे हे
नाद वाऱ्यावरी
रुणझुणू पैंजणे
उमटतील अंतरी

सूर ते बासुरी
छेडिता तो हरी
धावते धावते
राधिका बावरी

दंग होऊनी ती
रंग ते पांघरी
राधा त्या सारखी
कृष्ण राधे परी

साद ऐसी असो
आत्मरंगी दिसो
प्रीत ऐसी असो
रोमरोमी वसो

दि.१६/०८/२१
सकाळी ०९.१३ वा




## (७९)
## आतून माझ्या हरी बावळा

चित्त न माझे जल भरण्यातून
काठावरती कृष्ण सखा
एक घडा मज डोईवरती
एक कंबरी विसावला

निरव शांतता चोहीकडे ही
तरंग हळुहळु उठताती
सूर वेणूचे कानामधुनी
हृदयमंदिरी येताती

तो अविचल अन मी चंचल
तो स्थिर ऐसा मी अस्थिर
तो स्थायी कणकणातून बघ
मी अस्थायी क्षणभंगुर

तो बसलेला एका जागी
मी तर भ्रमणी गुंग सदा
तो सर्वत्र तरीही पोचतो
मी तर ध्येयासक्त उगा

तो चैतन्याचा हा पुतळा
रंग सावळा जरी काळा
मी गोरी तरी पिंड गोलका
आतून माझ्या हरी बावळा

चित्त तयाशी जडले आता
अवचित आक्रीत घडले आता
राधा वेडी झाली म्हणती
ती कृष्णाच्या संगे आता

दि.२६/०८/२१
सकाळी १०.५९ वा.



## (८०)
## कृष्ण आत्मिक सुवास

असा रम्यसा प्रवास
संगे मातीचा सुवास
थोडे स्वप्नांचे भास
थोडे कुंद हे आभास

आभाळाचे ओले श्वास
डोंगरांचे स्मित हास
गवताचे ते विलास
जलथेंबांचे विभास

हिरव्या रंगांचे प्रयास
मृदुलता आसपास
दरवळणारे ध्यास
गर्भारतेची कास

चैतन्याचा डोले वास
जळातून बिंब खास
आकाशाचा मोठा व्यास
हळवी धुक्याची ही रास

अशी सृष्टीची आरास
मन भावना भरास
आठवं भरे उरास
कृष्ण राधेची ग रास

चित्त त्याच्या पायी दास
का मी राहू गे उदास
त्याची अंतरात आस
कृष्ण आत्मिक सुवास

दि.०९/०९/२१
सायं ०५.४० वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २0२0 प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/ सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (चंद्र) - सुधांशु, (सूर्य) - दिव्यांतरी, (प्रीत - तिच्या मनातील कविता) - नादश्रुती, श्वेता, (सकाळ-संध्याकाळ) - लाघव वेळा, (वेळा) - तेंव्हा, (प्रेम - त्याच्या मनातील कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - अलवार, मधुश्री, सहा सोहळे, (फुले) - अळुमाळु, सुरभी, (पशु) - खाणाखुणा, (पक्षी) - वैष्णवी, (स्त्रीजीवन) - स्वामिनी, मृणालिनी, (धरती-आकाश) - प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) - मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) - प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com //lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utmsource=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=1266533350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ५४
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ४९
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •